CMYK

# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. १७ जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ६४ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## औषधांच्या नियमात मोठा बदल डॉक्टरांची 'चिठ्ठी' बंधनकारक!



वृत्तसंस्था

नवी दिल्ली : देशातील नागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी केंद्र सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा आणि धाडसी निर्णय घेतला आहे. आता देशभरातील फार्मसी किंवा औषधांच्या दुकानांतून खोकल्याची औषधे आणि इतर सिरप-आधारित औषधे थेट म्हणजेच 'ओव्हर-द-काउंटर' खरेदी करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. यापुढे अशी औषधे खरेदी करण्यासाठी नोंदणीकृत डॉक्टरांचे अधिकृत प्रिस्क्रिप्शन (चिठ्ठी) सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्र सरकारने 'ड्रग्ज अँड कॉस्मेटिक्स रूल्स, १९४५' मध्ये 'ड्रग्ज नियम, २०२६' अंतर्गत महत्त्वाचे बदल केले आहेत. यासंदर्भातील अधिकृत अधिसूचना ९ जून २०२६ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. या दुरुस्तीचा मुख्य भाग म्हणजे, १९४५ च्या नियमावलीतील 'शेड्यूल के'मधील अनुक्रमांक १३ च्या आयटम (७) मधून 'सिरप' हा शब्द वगळण्यात आला आहे. या तांत्रिक बदलामुळे आता सर्व प्रकारच्या सिरप-आधारित औषधांच्या विक्रीवर सरकारचे कडक नियंत्रण असणार आहे. गेल्या काही महिन्यांत मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये दूषित कफ सिरपच्या सेवनामुळे अनेक निष्पाप बालकांचा बळी गेल्याच्या दुर्दैवी घटना समोर आल्या होत्या. या घटनांनी आरोग्य यंत्रणेसमोर मोठे प्रश्नचिन्ह उभे केले होते. विशेषतः ऑक्टोबर २०२५ मध्ये 'श्रेसन फार्मास्युटिकल'ने उत्पादित केलेल्या 'कोल्ड्रिफ' सिरपमुळे २४ मुलांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. या घटनांनंतर औषध उत्पादनांच्या गुणवत्तेवर आणि त्यांच्या विक्रीच्या पद्धतींवर कठोर निर्बंध लादण्याची मागणी जोर धरत होती, ज्याची दखल घेत सरकारने हे पाऊल उचलले आहे.सरकारने हा निर्णय घाईत घेतलेला नसून, गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात या बदलाचा मसुदा सार्वजनिक चर्चेसाठी खुला केला होता. या मसुद्यावर आरोग्य तज्ज्ञ, नागरिक आणि औषध निर्मात्यांकडून आलेल्या सूचना व हरकतींचा सखोल विचार करण्यात आला. सर्व तांत्रिक आणि व्यावहारिक बाबी तपासून ९ जून २०२६ रोजी याची अंतिम अधिसूचना जारी करण्यात आली. आता हे नवीन नियम देशभर लागू झाले असून, सर्व औषध विक्रेत्यांना या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## पंतप्रधान मोदींना स्लोव्हाकियाचा सर्वोच्च सन्मान

वृत्तसंस्था

ब्रातिस्लावा : भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना स्लोव्हाकियाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'ऑर्डर ऑफ द व्हाईट डबल क्रॉस (प्रथम श्रेणी)' प्रदान करण्यात आला आहे. स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांनी सोमवारी (१५ जून २०२६) राजधानी ब्रातिस्लावा येथे हा सन्मान पंतप्रधान मोदींना प्रदान केला. हा सन्मान स्वीकारल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी स्लोव्हाकिया सरकार आणि तेथील जनतेचे आभार मानले. त्यांनी या गौरवाला भारत आणि स्लोव्हाकिया यांच्यातील दृढ आणि दीर्घकालीन मैत्रीला समर्पित केल्याचे सांगितले. हा सन्मान भारताच्या १.४ अब्ज नागरिकांचा आहे, असेही त्यांनी आपल्या प्रतिक्रियेत म्हटले. या पुरस्कारासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जगातील ३३ देशांकडून सर्वोच्च नागरी सन्मान मिळाल्याची नोंद झाली आहे. याआधी ३२ देशांनी त्यांना अशा प्रकारचे सन्मान प्रदान केले आहेत. दरम्यान, स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांनीही मोदींच्या नेतृत्वाचे कौतुक केले. त्यांनी भारतातील राजकीय स्थैर्य आणि सलग १२ वर्षे पंतप्रधानपद भूषवण्याच्या मोदींच्या कामगिरीला राजकीय चमत्कार असे संबोधले. ब्रातिस्लावामध्ये झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत फिको म्हणाले की, एवढ्या विविध आणि गुंतागुंतीच्या राजकीय वातावरणात दीर्घकाळ नेतृत्व टिकवणे ही अत्यंत उल्लेखनीय कामगिरी आहे.







सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर शाळा-अंगणवाडी प्रवेशोत्सव उत्साहात

## ढोल-ताशे, फुलांचा वर्षाव, सजवलेल्या ट्रॅक्टरमधून मिरवणुका; चिमुकल्यांचे जल्लोषात स्वागत

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व शाळा व अंगणवाड्यांमध्ये सोमवारी विविध उपक्रमांनी शाळा-अंगणवाडी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ढोल-ताशांच्या गजरात, टाळ्यांच्या कडकडाटात आणि फुलांच्या वर्षावात नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. ग्रामस्थ, पालक, शिक्षक आणि स्थानिक प्रतिनिधींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे गावागावांत शिक्षणाचा जल्लोष पाहायला मिळाला.

प्रवेशोत्सवानिमित्त जिल्ह्यातील शाळा व अंगणवाड्यांचा परिसर रांगोळ्या, फुगे आणि आकर्षक सजावटीने नटला होता. अनेक ठिकाणी सजवलेल्या ट्रॅक्टरमधून विद्यार्थ्यांच्या भव्य मिरवणुका काढण्यात आल्या, तर काही ठिकाणी दिंडीद्वारे चिमुकल्यांना शाळेत आणण्यात आले. शिक्षकांनी औक्षण करून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. फुलांच्या वर्षावात विद्यार्थ्यांचा वर्गात प्रवेश करण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद, आत्मविश्वास आणि उत्साह झळकत होता.



प्रवेशोत्सवादरम्यान विद्यार्थ्यांसाठी मिष्ठान्न भोजन, चॉकलेट व भेटवस्तूंचे वितरण करण्यात आले. अनेक ठिकाणी हातांचे रंगीत ठसे उपक्रम राबविण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेशांचेही वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या जोरदार घोषणांनी शाळांचा परिसर दणाणून गेला.

'प्रत्येक मुलगा-मुलगी शाळेत' हा संदेश प्रभावीपणे पोहोचविणे, शाळांची पटसंख्या शंभर टक्के वाढविणे आणि शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. प्रवेशोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आकर्षण निर्माण झाले असून पालक व ग्रामस्थांमध्येही शिक्षणाबाबत जागरूकता वाढल्याचे चित्र दिसून आले.

जिल्ह्यातील सर्व शाळा व अंगणवाड्यांमध्ये प्रवेशोत्सव यशस्वीपणे साजरा व्हावा यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, अश्विनी लाटकर, प्रकाश सोळंके तसेच महिला व बाल विकास विभागाच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगल पांचाळ यांनी चोख नियोजन केले होते.

ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे यंदाचा शाळा-अंगणवाडी प्रवेशोत्सव विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी अविस्मरणीय ठरला.

## सोयगाव तालुक्यातील बनोटी येथे ३५ बालकाची आरोग्य तपासणी



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१६ जून :** तालुक्यातील बनोटी येथे प्रकल्प कार्यालय व राष्ट्रीय बाल आरोग्य सुरक्षा अंतर्गत झालेल्या बाल आरोग्य तपासणी शिबिरात ३५ बालकाची आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषधी वाटप करण्यात आले.

या प्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ.खालिद झाकी यांनी सांगितले की जिल्हा शल्य चिकित्सक मुदखेडकर तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.चावला व वैद्यकीय अधीक्षक खंदारे यांच्या मार्गदर्शनाने कुपोषण कमी करण्यासाठी सर्वत्र आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. व बालकांना आरोग्य तपासणीनंतर संजय शहापूरकर यांच्या हस्ते मोफत औषधी वाटप करण्यात येणार आहे.

त्या नंतर डॉ.अख्तरी पठाण यांच्या हस्ते बालकांना मोफत औषधी वाटप करण्यात आले.

या प्रसंगी अंगणवाडी सेविका देवकन्या आसवाल,रत्ना जाधव,लताबाई वाघ,अनिता कुंभार,कविता शिंदे,सविता पाटील,जयश्री वाडेकर,सरिता पाटील,बेबी आधारे व मदतनीस उपस्थित होते.

## ब्रिटानिया सादर करत आहे क्रिस्पी टेक्शचरसोबत आता दुधाच्या चवीची मजा

मुंबई - ब्रिटानियाने नव्या दूध मारी गोल्डसह आपल्या मारी उत्पादनांमध्ये नवी भर घातली आहे. मैद्याचा अजिबात वापर न करता पूर्णपणे फक्त पिठापासून बनलेल्या या नव्या बिस्किटांमध्ये मारी बिस्किटांमधील मूळ हलके आणि क्रिस्पी टेक्श्चर कायम राखत त्यात दुधाच्या चवीची जोड देण्यात आली आहे. मारी बिस्किटांमध्ये अधिक सुंदर, आनंददायी चव हवी असणाऱ्या ग्राहकांसाठी ही बिस्किटे खास तयार करण्यात आली आहेत. दूध मारी गोल्डमध्ये एक अनोखी चव आणि मारी बिस्किटांची ओळख असलेली वैशिष्ट्ये यांचा सुंदर मेळ आहे. त्यामुळे, याच उत्पादनवर्गात ग्राहकांना एक अनोखा आणि नवा अनुभव मिळतो. चव आणि टेक्श्चर यांचा समतोल साधत या नव्या बिस्किटात ब्रिटानियाने ग्राहकांच्या बदलत्या आवडींनुसार नाविन्यतेवर भर दिला आहे. त्याचप्रमाणे ग्राहकांच्या आवडीच्या हलक्या आणि क्रिस्पी मारी बिस्किटांमध्ये दुधाची मस्त चवही दिली आहे.

## प्रिझम ने ट्रॅव्हल पार्टनर्सच्या सहकार्याने नेटवर्क मजबूत केले

**पुणे :** ओयोची मूळ कॉर्पोरेट कंपनी, प्रिझमने, पश्चिम भारतातील आपल्या विस्तार कार्यक्रमाला अधिक बळकटी देण्यासाठी पुणे येथे भव्य ट्रॅव्हल पार्टनर मीट आयोजित केली. या कार्यक्रमात प्रदेशातील 150 हून अधिक आघाडीच्या ट्रॅव्हल एजंट्स आणि पर्यटन उद्योगातील भागीदारांनी सहभाग घेतला.या कार्यक्रमात प्रिझम ने आपल्या ग्राहकाभिमुख विविध ब्रँड्स आणि सेवांचे सादरीकरण केले. यामध्ये संडे, क्लबहाऊस, पॅलेट, टाऊनहाऊस आणि डॅनसेंटर या ब्रँड्सचा समावेश होता. राज्यभरातील ट्रॅव्हल एजंट्सनी PRISM च्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधून हॉस्पिटॅलिटी क्षेत्राविषयी माहिती मिळवली तसेच भारत आणि जागतिक स्तरावरील व्यावसायिक संधींचा आढावा घेतला.

# कुंभेफळ शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत; शाळा प्रवेश उत्सवात शालेय साहित्य व गणवेशाचे वाटप; शिक्षणाच्या गुणवत्तेवर भर

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, कुंभेफळ येथे शाळा प्रवेश उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शाळेत प्रथमच दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन, टाळ्यांच्या गजरात आणि आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सावरगावकर यांच्या हस्ते झाले. यावेळी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य तसेच गणवेशाचे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना वासुदेव सोळंके यांनी शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा पाया असल्याचे सांगितले. प्रत्येक विद्यार्थ्याने नियमित शाळेत उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, स्वच्छता आणि आरोग्यदायी





सवयी विकसित होण्यासाठी पालकांनीही सक्रिय भूमिका बजावण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाला गावचे सरपंच, स्थानिक पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सहभागामुळे प्रवेशोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शासकीय शाळांबाबत समाजामध्ये विश्वास निर्माण करणे, विद्यार्थ्यांना शिक्षणाकडे आकर्षित करणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा संदेश घराघरांपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# पैठणला अन्न भेसळ पथकाच्या भीतीने शटर डाऊन

तभा वृत्तसेवा

**पैठण दि १६ :-** तुकाराम मुंढे यांनी महाराष्ट्र राज्याच्या अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाचे आयुक्त पदी कार्यरत होताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यासह छत्रपती संभाजीनगरला विभागाने अनेक ठिकाणी कारवाई करत मोठा साठा जप्त करून यात सहभागी असणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत आता हे पथक पैठणला आल्याने कारवाईच्या भीतीने थेट चितेगांव ते पैठण पर्यंत तसेच शहरात अनेक दुकानदारांनी आपल्या आस्थापना बंद ठेवल्या.

पथक येणार पथक येणार अश्या अफवा आठवडाभरापासून फिरत होत्या. यासाठी पैठण शहागड रस्त्यावरील काही दुकानदारांनी आपापली दुकाने बंद ठेवली होती. त्यानंतर विहामांडावा, पाचोड भागात अशीच परिस्थिती होती. शनिवार पासून पैठणला पथक आले, पथक आले अशी सूचना मिळताच चितेगांव, बीडकीन, ढोरकीन, एम,आय,डी,सी सह पैठण शहर, पाचोड फाटा, शहागड फाटा, पाटेगाव, दक्षिण जायकवाडी जवळील काही आस्थापाना बंद करण्यात आल्या होत्या. मंगळवारी चितेगांव, बीडकीन आणि पैठणला पथकाने संशयित गुटखा गोडावून, होलसेल किराणा, हॉटेल्स आदी ठिकाणी झाडाझडती घेतल्याची चर्चा सुरु होती.

पथकाच्या भीतीने या दुकाना बंद - तंबाखू जन्य पदार्थ मावा, पान टपाऱ्या, हॉटेल्स, बेकरी, किराणा दुकाने,आयस्क्रीम दुकाने, मिठाई भंडार,ज्यूस पार्लर, मेडिकल स्टोअर्स,खवा विक्री, दुध डेअरी, नाष्टा सेंटर, कोल्ड्रिंक,नाष्टा सेंटर अश्या विविध काही आस्थापना कारवाईच्या भीतीने बंद करण्यात आल्या होत्या.यामुळे खर्रा, मावा, तंबाखू,गुटखा प्रेमींची चांगलीच गोची झाली.

पैठण शहर व्यापारी महासंघाने व्यापारी बांधवांना आवाहन केले असून, सर्व व्यापारी आपला व्यवसाय नेहमीच नियमांनुसार चालवत असले तरी सध्याच्या परिस्थितीत अधिक जागरूक राहण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. घाऊक विक्रेत्यांकडून पक्क्या बिलावरच माल खरेदी करावा, आवश्यक परवाने अद्ययावत ठेवावेत, वस्तूंची गुणवत्ता व कालबाह्यता तारीख तपासावी तसेच गुटखा व इतर प्रतिबंधित पदार्थांची विक्री टाळावी. ग्राहकांना सुरक्षित व दर्जेदार वस्तू उपलब्ध करून देणे ही सर्व व्यापाऱ्यांची सामूहिक जबाबदारी असल्याचे महासंघाने वतिने प्रमुख सल्लागार पवन लोहिया यानी स्पष्ट केले आहे.

## अग्रसेन विद्या मंदिरात विद्यार्थी संसदेचे उद्घाटन





**छत्रपती संभाजीनगर :** पैठण रोड येथील अग्रसेन विद्या मंदिर (AVM) शाळेत विद्यार्थी संसदेचे उद्घाटन व पदग्रहण समारंभदि. 22/04/2026 रोजी संपन्न झाला. प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. दि. 02/06/2026 रोजी लोकशाही पद्धतीचे प्रात्यक्षिक दर्शविणारी निवडणुक शाळेच्या सभागृहात घेण्यात आली. शैक्षणिक वर्ष 2026-27 मध्ये विद्यार्थी प्रमुखपदी वंश अग्रवाल तर विद्यार्थीनी प्रमुखपदी आयुषी पाटनी तर विद्यार्थी उपप्रमुख पदी आरुष मेथी व विद्यार्थीनी उपप्रमुख पदी खुशबू पांडे यांची निवड झाली. क्रीडा प्रमुख म्हणून अजिंक्य शिवणकर व सांस्कृतिक प्रमुख म्हणून सारा जैन यांनी सूत्रे स्विकारली.

शाळेतील अशोका, भगतसिंग, शिवाजी व टागोर हाऊसच्या कॅप्टन पदी अनुक्रमे अनन्या डोणगावे, अर्णव मुंदडा, लब्धी साकला, अर्णव देशमुख तर व्हाईस कॅप्टन पदी रिया मुलीक, नैतिक बवाडी, साची सारडा व सई कल्याणकर यांची नियुक्ती झाली. विद्यार्थ्यांनी आपआपल्या पदाची शपथ रविंद्र बाकलीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली घेतली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी शाळेची शिस्त व मान राखण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमासाठी व्यासपीठावर प्रमुख पाहुणेपदी शाळा समितीचे अध्यक्ष सच्चानंदजी अग्रवाल, सचिवा निधीजी विजयजी अग्रवाल, कोषाध्यक्ष पंकजजी अग्रवाल तसेच अग्रवाल सभा अध्यक्ष कुंजबिहारीजी अग्रवाल उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना जिद्दीला जर सकारात्मक प्रयत्नांची साथ मिळाली तर स्वतःचे जीवन निश्चित यशस्वी होते. त्याचबरोबर डोळस नेतृत्व गुण समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहेत व त्याची सुरुवात नेहमी स्वतः पासून करावी अशी अपेक्षा विद्यार्थ्यांकडून व्यक्त केली. निवडून आलेल्या सर्व यशस्वी कार्यकर्त्यांचे प्रमुख पाहुण्यांनी शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या शिस्तबद्ध आयोजनासाठी शाळेचे प्राचार्य संतोष कुमार करवा व उपप्राचार्या मयुरी लोगलवार, अधीक्षक अजय सोनुने, विभाग प्रमुख सुचिता मुंदडा, उर्मिला करंगुला कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन नृत्य शिक्षक विक्रम शर्मा व एनसीसी ऑफिसर सौरभ जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## 'तू ही रे दिल में'मधील वृंदाची भूमिका प्रियांशी यादवसाठी मोठे आव्हान

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीची नवी भावनिक मालिका 'तू ही रे दिल में' १५ जूनपासून प्रेक्षकांच्या भेटीला आली असून या मालिकेतील वृंदा या मध्यवर्ती भूमिकेबाबत अभिनेत्री प्रियांशी यादवने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. प्रेम, नशीब आणि नात्यांतील गुंतागुंत यावर आधारित असलेल्या या मालिकेत वृंदा ही श्रद्धाळू, संयमी आणि नशिबावर विश्वास ठेवणारी मुलगी आहे.

प्रियांशी यादव म्हणाली की, वृंदाची व्यक्तिरेखा तिच्या आतापर्यंतच्या कारकिर्दीतील सर्वांत आव्हानात्मक भूमिकांपैकी एक आहे. "वृंदा आणि प्रियांशी या स्वभावाने पूर्णपणे वेगळ्या आहेत. अनेक प्रसंगी मला वाटते की वृंदाने स्वतःसाठी आवाज उठवावा, मात्र तिचा देवावरील अढळ विश्वास आणि शांत स्वभाव हीच तिची खरी ओळख आहे. त्यामुळे तिच्या भावविश्वात शिरून तिच्या विचारसरणीला समजून घेणे हे मोठे आव्हान ठरते," असे ती म्हणाली.



या मालिकेत प्रियांशी यादवसोबत अब्रार काझी (संजय) आणि सिमरन रावल (स्वाती) यांच्या प्रमुख भूमिका आहेत. तीन व्यक्तींच्या आयुष्याभोवती फिरणारी ही कथा आशा, संघर्ष, प्रेम आणि भावनिक वळणांनी भरलेली आहे. प्रेक्षकांनी वृंदाच्या प्रवासाशी जोडले जावे आणि मालिकेला भरभरून प्रतिसाद द्यावा, अशी अपेक्षा प्रियांशीने व्यक्त केली.'तू ही रे दिल में' ही मालिका दररोज संध्याकाळी ७ वाजता झी टीव्हीवर प्रसारित होत आहे.

# एमजीएममध्ये वर्षमंगल दिन, कुलपती अंकुशराव कदम यांचा 82 वा वाढदिवस साजरा

**छत्रपती संभाजीनगर, दि.१५ :** महात्मा गांधी मिशनचे सचिव तथा एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांचा ८२ वा वाढदिवस आज 'वर्षामंगल' दिनाच्या निमिताने एमजीएममध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या औचित्याने वृक्षारोपण, सांस्कृतिक कार्यक्रम, उद्घाटन आणि समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात एमजीएम गांधेली परिसरात आज ८३ वृक्षांची लागवड करून करण्यात आली. त्यानंतर सकाळी एमजीएम विद्यापीठ परिसरात नव्याने उभारलेल्या इलेक्ट्रिकल सब स्टेशन'चे उद्घाटन करण्यात आले. या ठिकाणी प्रातिनिधिक स्वरूपात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच रुक्मिणी सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात सर्वांना वृक्ष वाटप करण्यात आली. त्याचप्रमाणे एमजीएम युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ इन्स्ट्रुमेंटेशन अँड कंट्रोल इंजिनिअरिंगच्या शैक्षणिक सुविधांच्या नामफलकांचे अनावरण यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमासाठी एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, शिक्षणतज्ञ श्री.भाऊसाहेब राजळे, डॉ.पी.वाय.कुलकर्णी, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, श्रीमती अनुराधाताई कदम तसेच एमजीएम परिवारातील सर्व सदस्य, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## प्रितांशी इचुल, परी कदम यांना ब्लॅक बेल्ट प्रदान - मार्शल आर्ट्स क्षेत्रात उल्लेखनीय यश

**छत्रपती संभाजीनगर :** असोसिएशन ऑफ मार्शल आर्ट्स अँड स्पोर्ट्स, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कराटे ग्रेड बेल्ट वितरण समारंभात प्रितांशी इचुल व परी कदम यांना ब्लॅक बेल्ट प्रदान करण्यात आला. हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

संस्था गेल्या ३५ वर्षांपासून कराटे क्षेत्रात कार्यरत असून महिला सक्षमीकरण व सेल्फ डिफेन्सचे मोफत प्रशिक्षण देण्याचे कार्य करत आहे. संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांनी जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे. यावेळी प्रितांशी इचुल , परी कदम, सुनील पाडे व आदित्य घाटे यांना ब्लॅक बेल्ट प्रदान करण्यात आला. तसेच विविध गटांतील विद्यार्थ्यांनी बेल्ट परीक्षेत यश मिळवत प्रात्यक्षिके सादर केली. संस्थेचे प्रशिक्षक प्रतीक काकडे, कुणाल काकडे व तुषार काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. विद्यार्थ्यांना संस्थेचे उपाध्यक्ष व मुख्य प्रशिक्षक नंदू काकडे, संजीवनी होर्शील व डॉ. अभिजीत भगत यांच्या हस्ते बेल्ट व पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मार्शल आर्ट्स क्षेत्रातील या यशाबद्दल सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## पाहिजेत

### उगम ग्रामीण विकास संस्था उमरा

**ता. कळमनुरी जि. हिंगोली ४३१ ७०२ येथे खालील पदे भरणे आहेत.**

| पद | पात्रता | संख्या | अनुभव | मानधन |
|---|---|---|---|---|
| इंजिनियर | B. Tech, M. Tech | १ | पाणलोट क्षेत्रातील कामाचा अनुभव | रु. ३०,०००/- |
| Taxonomist | MSC | १ | झाडे आणि गवत ओळखता येणे आवश्यक | रु. २५,०००/- |
| लेखापाल | B.Com/ M.Com | १ | Tally, MSCIT अनुभव असल्यास प्राधान्य | रु. १८,०००/- |
| संगणक शिक्षक | BCA/ पदवीधर | १ | अनुभव असल्यास प्राधान्य (महिलांना प्राधान्य) | रु. १२,०००/- |

*नोट: वरील पदे किमान तीन वर्षासाठी भरण्यात येत आहे.

इच्छुक उमेदवारांनी आपले Resume/CV/Biodata दि. १६/०६/२०२६ पर्यन्त recruitment.ugamgvs@gmail.com या ईमेल वर पाठवावे. फक्त निवडक उमेदवारांनाच संपर्क करून कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी. मुलाखत दि. २८/०६/२०२६ रोजी घेण्यात येईल. मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे.

**उगम ग्रामीण विकास संस्था उमरा ता. कळमनुरी जि. हिंगोली**

**फक्त व्हाटसअप्पद्वारे संपर्क करावा: ८८८८२८१०३२, टोल फ्री क्र. १८०० २०९ २०२७**


**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

### जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १०३/२०२६.

अर्जदार : १. मैदाबी तुराब तडवी, वय. ७० वर्षे, धंदा. घरकाम, २. बशीर तुराब तडवी, वय. ३८ वर्षे, धंदा. मजुरी, ३. इकबाल तुराब तडवी, वय. ३० वर्षे, धंदा. मजुरी, ४. अयुब तुराब तडवी, वय. २७ वर्षे, धंदा. मजुरी, सर्व रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर,

-विरुध्द-

गैरअर्जदार :-कोणीही नाही.

प्रकरण :- वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत तुराफ समशेर तडवी हे दि. २६/०२/२०२६ रोजी मोजे. टिटवी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे तुराफ समशेर तडवी यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीखः २०/०७/२०२६.

आज दि. ११/०६/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय का स्तर, सोयगांव

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मान्सुनच्या पार्श्वभुमीवर परभणीतील रस्ते दुरुस्ती

## चितनरवाडीतील ग्रामस्थांचे तहसीलदारांना उपरोधिक निवेदन

**परभणी ,/प्रतिनिधी:-** जिंतूर तालुक्यातील मौजे चितनरवाडी येथील रस्ता व ओढ्यावरील पूल बांधकामासाठी शासनाकडून दोन वर्षांपूर्वी मंजूर झालेला निधी अद्याप खर्च न झाल्याने गावाच्या रस्ता आणि पूलासाठी उलगुलान आंदोलन करणाऱ्या ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात उपरोधिक पद्धतीने तहसीलदारांना निवेदन सादर केले आहे. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांना पोहण्याचे प्रशिक्षण देण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या चार वर्षांपासून उलगुलान आंदोलनाद्वारे गावाच्या रस्ता पुल बांधकामासाठी सर्व ग्रामस्थ लोकशाही मार्गाने सातत्याने लढा देत आहेत. पावसाळ्यात गावालगतच्या ओढ्याला पूर येऊन परिसर जलमय होतो. ओढे-नाले दुथडी भरून वाहत असल्याने नागरिक, विद्यार्थी, महिला, शेतकरी व ज्येष्ठ नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो. रस्ता व पूल बांधकामासाठी निधी उपलब्ध असूनही संबंधित यंत्रणेकडून कामे सुरू करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी



केला आहे.

मागील चार वर्षांपासून विविध शासकीय कार्यालयांकडे पाठपुरावा करूनही प्रश्न सुटलेला नसल्याने ग्रामस्थांनी प्रशासनाला उपरोधिक इशारा दिला आहे. रस्ते व पूल उपलब्ध करून देण्याऐवजी नागरिकांना मोफत पोहण्याचे प्रशिक्षण, लाईफ जॅकेट, दोरखंड व अन्य बचाव साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी स्पष्ट केले की, त्यांची खरी मागणी पोहण्याचे प्रशिक्षण नसून मंजूर निधी तात्काळ खर्च करून रस्ता व पूल बांधकामाची कामे पूर्ण करावीत हीच आहे. अन्यथा पावसाळ्यात घडणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेस संबंधित विभाग व प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदन विठ्ठल जाधव व समस्त ग्रामस्थ, चितनरवाडी यांच्या वतीने तहसीलदार, जिंतूर यांना सादर करण्यात आले. दोन आठवड्यात उत्तर न दिल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता परभणी यांच्या दालनात जवाब दो आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### मनपाची नाला स्वच्छता मोहीम युद्धपातळीवर; आजम कॉलनी परिसरात विशेष स्वच्छता अभियान

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील नाल्यांच्या स्वच्छतेसाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून बसस्थानक परिसरातील निरज हॉटेलसमोरील नाला तसेच आजम कॉलनी परिसरात शुक्रवारी व्यापक स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

उपायुक्त तुकाराम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या मोहिमेत मुख्य स्वच्छता निरीक्षक श्रीकांत कु-हा, स्वच्छता कर्मचारी, मुकादम आणि इतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. नाल्यांमधील गाळ, कचरा आणि अडथळे दूर करण्यासाठी जेसीबी, पोकलॅड, टिप्पर तसेच विविध यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आला. महानगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रमुख आणि मोठ्या नाल्यांची स्वच्छता युद्धपातळीवर सुरू असून प्रभाग समिती अ, ब आणि क अंतर्गत विविध भागांमध्ये नियमित स्वच्छता मोहीम राबविली जात आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी साचू नये आणि नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

दरम्यान, शहरातील भाजी विक्रेते, फळ विक्रेते, व्यापारी तसेच नागरिकांनी आपल्या परिसरात स्वच्छता राखण्यासाठी डस्टबिनचा वापर करावा आणि घरातील कचरा केवळ घंटागाडीतच टाकावा, असे आवाहन महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर आणि स्थायी समिती सभापती प्रतिभा सरोदे यांनी केले आहे.

स्वच्छ आणि निरोगी शहरासाठी महानगरपालिकेच्या स्वच्छता मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करावे, असेही प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

### लसीकरण मोहीमेसंदर्भात महानगरपालिकेत प्रशिक्षण कार्यशाळा

**परभणी,/प्रतिनिधी:** महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत २८ जून २०२६ रोजी एक ते पाच वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ लस देण्यात येणार आहे. या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महानगरपालिका स्तरावर शुक्रवारी (दि. १२) विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

ही कार्यशाळा जागतिक आरोग्य संघटनेचे समन्वयक डॉ. मुजीब सय्यद (औरंगाबाद) आणि महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कार्यशाळेत पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा सूक्ष्म कृती आराखडा तयार करणे, लसीकरण बूथचे नियोजन, रेल्वे स्थानक, बसस्थानक, झोपडपट्ट्या, वीटभट्ट्या, खडी केंद्रे, वाडी-वस्ती तसेच बांधकाम क्षेत्रांमध्ये विशेष लसीकरण मोहीम राबविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय पोलिओ लसीची साठवणूक, वाहतूक आणि लसीकरणादरम्यान घ्यावयाची काळजी याबाबतही माहिती देण्यात आली.

डॉ. मुजीब सय्यद यांनी लसीकरण मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रत्येक बालकापर्यंत पोहोचण्याचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी आरोग्य विभागातील सर्व वैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान, २८ जून रोजी होणाऱ्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत एक ते पाच वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस पाजून मोहिमेला यशस्वी करावे, असे आवाहन महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर, सभागृह नेते सय्यद समी उर्फ माजुलाला, स्थायी समिती सभापती प्रतिभा सरोदे, आरोग्य सभापती कु. अबोली कांबळे आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत यांनी केले आहे.

### बोरी अप्पर तहसील कार्यालय स्थलांतराच्या निषेधार्थ उद्यापासून बेमुदत बंद : सर्वपक्षीय बैठकीत निर्णय; व्यापारी, नागरिक व विविध संघटनांचे प्रशासनाला निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर करण्याची दीर्घकालीन मागणी असतानाही शासनाने चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर केल्याने बोरी व परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ सर्वपक्षीय नेते, व्यापारी आणि नागरिकांनी शुक्रवारी प्रशासनाला निवेदन देत १३ जूनपासून बोरी बाजारपेठ व आठवडी बाजार बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

बोरी येथील नागरिक अनेक वर्षांपासून अप्पर तहसील कार्यालयाची मागणी करत आहेत. गेल्या काही महिन्यांत या मागणीने अधिक जोर धरला होता. यासंदर्भात शासनाकडे प्रस्तावही पाठविण्यात आले होते. मात्र, अप्पर तहसील कार्यालयाची मंजुरी चारठाणा येथे झाल्याचे समोर आल्यानंतर बोरी परिसरात नाराजीचे वातावरण निर्माण झाले.

या पार्श्वभूमीवर शुक्रवारी बोरी येथील महादेव मंदिरात सर्वपक्षीय व सर्वस्तरीय नागरिकांची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे अजय चौधरी, भाजपचे सतीश चौधरी, सरपंच निर्मलाताई चौधरी, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष संतोष चौधरी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत अनेकांनी आपली मते व्यक्त करत बोरीला अप्पर तहसील कार्यालय न मिळाल्याबद्दल संताप व्यक्त केला. अखेर सर्वानुमते १३ जूनपासून बोरी बाजारपेठ व आठवडी बाजार बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयाबाबतचे निवेदन बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांना देण्यात आले. निवेदनावर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अजय चौधरी, भाजपचे सतीश चौधरी, सरपंच निर्मलाताई चौधरी, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष संतोष चौधरी, राजाभाऊ गोरे, किशनराव गोरे, डॉ. अरुण चौधरी, संदीप सोमाणी, पंचायत समिती सदस्या लक्ष्मीताई कनकुटे, अश्विनीताई चौधरी यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी, व्यापारी आणि नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### गोदावरी नदीपात्रात बुडून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी :** पालम तालुक्यातील मौजे फळा परिसरातील गोदावरी नदीपात्रात आंघोळीसाठी गेलेल्या १२ वर्षीय मुलाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी (११ जून) सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली.

साई कैलास पवार (वय १२ वर्षे, रा. रायवाडी, ता. लोहा, जि. नांदेड) हा मुलगा आपल्या कुटुंबासह मौजे फळा येथे देवदर्शनासाठी आला होता. गुरुवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास तो गावातील नदीपात्रात आंघोळ करण्यासाठी उतरला. मात्र त्याला पोहता येत नसल्याने तसेच पाण्याचा खोलीचा अंदाज न आल्याने त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

## महाडीबीटीच्या मोफत सोयाबीन बियाणे योजनेत बहुतांश शेतकरी वंचित : हजारो अर्जांमधून केवळ ३४५ शेतकऱ्यांची निवड

**सेलू,/प्रतिनिधी-** शासनाच्या वतीने महाडीबीटी पोर्टलद्वारे शेतकऱ्यांना मोफत सोयाबीन बियाणे वाटप करण्यात येत असले तरी सेलू तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी अर्ज करूनही केवळ ३४५ शेतकऱ्यांची निवड झाल्याने उर्वरित शेतकरी या योजनेपासून वंचित राहिल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे मोफत बियाण्यांसाठी अर्ज केलेल्या अनेक शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

तालुक्यात सुमारे ५५ हजारांहून अधिक शेतकरी असून मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून मोफत सोयाबीन बियाण्यांसाठी ऑनलाइन अर्ज दाखल केले होते. कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या वतीने संगणकीय सोडत पद्धतीने लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. मात्र हजारो अर्जांमधून केवळ २२० वैयक्तिक शेतकरी आणि आत्मा अंतर्गत असलेल्या शेतकरी गटांमधील १२५ शेतकरी असे एकूण ३४५ लाभार्थी पात्र ठरले आहेत.

योजनेनुसार एका हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत मोफत सोयाबीन बियाणे देण्यात येतात. साधारणपणे एका एकरासाठी २५ किलो बियाण्यांचे वाटप केले जाते. मात्र मोठ्या संख्येने अर्ज करूनही लाभ मिळाला नसल्याने अनेक शेतकरी संताप व्यक्त करत आहेत. मोफत बियाण्यांच्या आशेने ऑनलाइन अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वेळ आणि खर्च केलेल्या शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. शासनाने केवळ मर्यादित लाभार्थ्यांची निवड केल्याने बहुतांश शेतकरी योजनेपासून दूर राहिल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

याबाबत कृषी विभागाने पात्र लाभार्थ्यांची निवड संगणकीय सोडतीद्वारे पारदर्शक पद्धतीने करण्यात आल्याचे स्पष्ट केले असले, तरी लाभार्थ्यांची संख्या वाढवून अधिकाधिक शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## कॅनॉलच्या सिमेंट भिंतीवर ट्रॅक्टर पलटी; चालकाचा मृत्यू : वाघपिंपरी शिवारातील दुर्घटना

**परभणी,/प्रतिनिधी-** सेलू तालुक्यातील वाघपिंपरी शिवारात कॅनॉलच्या सिमेंट भिंतीवर ट्रॅक्टर पलटी झाल्याने चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना १० जून रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घडली.

बालाजी विठ्ठलराव जाधव (वय २५, रा. वाघपिंपरी) हे ट्रॅक्टर घेऊन शिराळा येथे शेतीच्या कामासाठी जात होते. त्यावेळी वाघपिंपरी शिवारातील कॅनॉलजवळ ट्रॅक्टरवरील नियंत्रण सुटल्याने वाहन कॅनॉलच्या सिमेंट भिंतीवर आदळून पलटी झाले. या अपघातात ट्रॅक्टरच्या खाली दबून बालाजी जाधव यांचा मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी गोविंद विठ्ठलराव जाधव यांनी सेलू पोलिसांत फिर्याद दिली असून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज यांना 'तपोरत्नम' पुरस्कार जाहीर

**परभणी,/प्रतिनिधी :** अध्यात्म, योग, समाजप्रबोधन आणि मानवकल्याणाच्या क्षेत्रात गेल्या पंचवीस वर्षांपासून निरपेक्ष भावनेने कार्य करणारे सोनपेठ येथील पूज्य श्री नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज यांना प्रतिष्ठेचा 'तपोरत्नम' पुरस्कार जाहीर झाला आहे. काशीचे जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी आणि डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी यांच्या आदेशानुसार श्री जगद्गुरू विश्वाराध्य जनकल्याण प्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्या वतीने हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे.

दि. १४ जून रोजी सोलापूर येथील वीरतपस्वी मंदिरात जगद्गुरू पंचाचार्य यांच्या उपस्थितीत आयोजित विशेष समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे प्रबंधक राजेंद्रकुमार स्वामी यांनी दिली.

सन २००० मध्ये सोनपेठ मठावर विराजमान झाल्यानंतर श्री नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज यांनी अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. सन २००२ पासून त्यांनी देशातील बारा ज्योतिर्लिंगांमध्ये श्रावणमास अनुष्ठानांची परंपरा सुरू केली. उज्जैन येथील महाकालेश्वर ज्योतिर्लिंगापासून प्रारंभ झालेला हा प्रवास परळी वैद्यनाथ येथे बाराव्या अनुष्ठानाने पूर्ण झाला. त्यानंतर मराठवाड्यातील विविध गावांमध्ये श्रावणमास अनुष्ठानांच्या माध्यमातून अध्यात्मिक जागृतीचे कार्य सुरू आहे.महाराजांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी वैदिक बालसंस्कार शिबिरे, शैक्षणिक साहित्य वाटप, गुणवंत विद्यार्थी सत्कार, आरोग्य शिबिरे, वृक्षारोपण उपक्रम तसेच समाजातील विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय व्यक्तींचा गौरव करण्यात येतो. देशासाठी बलिदान देणाऱ्या शहीद जवानांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करून त्यांनी सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला आहे.

'बेटी बचाव, बेटी पढाव' अभियानांतर्गत १११ मुलींच्या नावे प्रत्येकी ११ हजार रुपयांच्या ठेवी जमा करून त्यांनी स्त्रीशिक्षण आणि महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तसेच वैदिक परंपरा जतन करण्यासाठी आणि भावी पिढीसाठी पुरोहित तयार करण्याच्या उद्देशाने वैदिक प्रशिक्षण शिबिरांचेही आयोजन केले जाते.

पंचवीस वर्षांच्या कालावधीत अनेक अडचणींवर मात करत त्यांनी सोनपेठ मठाचा सर्वांगीण विकास घडवून आणला असून अध्यात्म, संस्कार आणि समाजसेवेचे प्रभावी केंद्र म्हणून मठाची ओळख निर्माण केली आहे.त्यांच्या या बहुआयामी, लोककल्याणकारी आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेत त्यांना ङ्गतपोरत्नमम पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असल्याने भक्तपरिवार, शिवाचार्य परंपरेतील अनुयायी आणि सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## चारठाणा अप्पर तहसील कार्यालयाला मंजुरी; नागरिकांकडून जल्लोष : पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या पाठपुराव्याला यश

**चारठाणा,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर करण्याच्या मागणीला अखेर यश मिळाले असून गुरुवारी मंजुरीचे पत्र प्राप्त होताच चारठाणा येथे नागरिकांनी फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला. या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर करण्यासाठी काही दिवसांपूर्वी पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुंबई येथे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली होती. या बैठकीत चारठाण्याच्या भौगोलिक, प्रशासकीय आणि ऐतिहासिक महत्त्वाचा सविस्तर आढावा सादर करण्यात आला होता. तसेच नागरिकांना भेडसावणाऱ्या प्रशासकीय अडचणी, विस्तीर्ण महसूल मंडळ क्षेत्र आणि निजामकालीन परगणा म्हणून असलेले चारठाण्याचे ऐतिहासिक अस्तित्व यांचा उल्लेख करून स्वतंत्र अप्पर तहसील कार्यालयाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली होती.

पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी चारठाण्याचे भौगोलिक स्थान, वाढती लोकसंख्या आणि प्रशासनिक सुविधांचा अभाव याकडे महसूलमंत्र्यांचे लक्ष वेधले होते. त्यानंतर महसूलमंत्री बावनकुळे



यांनी या मागणीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. तसेच या मागणीबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासनही त्यांनी दिले होते.

मंजुरी मिळाल्यानंतर चारठाणा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. अप्पर तहसील कार्यालय सुरू झाल्यानंतर स्थानिकांना तहसील मुख्यालयावर वारंवार जाण्याची गरज कमी होणार असून वेळ आणि खर्चाची बचत होणार आहे. तसेच विविध प्रशासकीय कामे स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्याने विकास प्रक्रियेलाही गती मिळणार आहे.

या शिष्टमंडळात भाजपचे नानासाहेब राऊत, पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख, अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मतीन तांबोळी, दीपक भाग्यवंत, संदीप देशमुख, साबेर पठाण आदींचा समावेश होता.

चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालय मंजूर होण्यासाठी पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी विशेष प्रयत्न केले असून त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच हा निर्णय शक्य झाल्याचे मत भाजपचे नेते नानासाहेब राऊत यांनी व्यक्त केले.

## कोचिंग क्लासेससाठी स्वतंत्र कायदा करा : काँग्रेसची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी-** जिल्ह्यातील काही शाळांकडून विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, गणवेश, स्टेशनरी व इतर शैक्षणिक साहित्य विशिष्ट दुकानांतूनच खरेदी करण्याची सक्ती केली जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. तसेच राज्यभरात खाजगी कोचिंग क्लासेसचे वाढते व्यापारीकरण, अवाजवी शुल्क आकारणी आणि विद्यार्थी-पालकांची होणारी आर्थिक पिळवणूक याबाबत कठोर उपाययोजना करण्याची मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

काँग्रेसचे सुहास पंडित, सत्तार इनामदार, आमिर खान पठाण, ज्ञानेश्वर वाघमारे, प्रसाद डुकरे, संजय पारडे, युनूस भाई, रौफ अत्तार, नितीन रनेर, नविद आदी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने शुक्रवार १२ जून रोजी या संदर्भात जिल्हा प्रशासनामार्फत मुख्यमंत्र्यांना एक निवेदन सादर केले. शाळांकडून शैक्षणिक साहित्य खरेदीची सक्ती रोखण्यासाठी तसेच राज्यात स्वतंत्र खाजगी कोचिंग क्लासेस विनियमन कायदा लागू करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. तसेच काही शाळांकडून विशिष्ट दुकानांमधून साहित्य खरेदी करण्यासाठी पालकांवर दबाव टाकला जात असून त्यामुळे पालकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे, राज्यातील अनेक खाजगी कोचिंग क्लासेसकडून अवाढव्य शुल्क आकारले जात असून प्रवेशानंतर फी परत न करण्याच्या अटी, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि निकालांचे अतिरंजित सादरीकरण यामुळे पालक व विद्यार्थ्यांची फसवणूक होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शाळांच्या साहित्य विक्रीची चौकशी, सक्ती करणाऱ्या संस्थांवर कारवाई, कोचिंग क्लासेसची अनिवार्य नोंदणी, शुल्क नियंत्रण यंत्रणा, विद्यार्थ्यांच्या तक्रार निवारणासाठी स्वतंत्र प्राधिकरण, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के मोफत जागा कोचिंग क्लासेसमध्ये तरतूद तसेच राज्यातील प्रमुख कोचिंग संस्थांच्या कार्यपद्धतीची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## १५ वर्षांपासून बंद असलेला 'भांगापूर-मारवाडी' शेतरस्ता अखेर मोकळा : महसूल विभागाच्या मध्यस्थीने वाद मिटला; ३० ते ४० शेतकऱ्यांच्या वहिवाटीचा प्रश्न मार्गी

**सेलू,/प्रतिनिधी :** प्रशासकीय इच्छाशक्ती आणि गावकऱ्यांच्या सामंजस्याच्या बळावर महसूल विभागाने आणखी एक उल्लेखनीय कामगिरी करत भांगापूर शिवारातील गेल्या १५ वर्षांपासून बंद असलेला 'भांगापूर-मारवाडी' शेतरस्ता मोकळा केला आहे. सुमारे दीड किलोमीटर लांबीच्या या रस्त्यावरील अडथळे दूर झाल्याने परिसरातील ३० ते ४० शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या वहिवाटीचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न सुटला आहे.

भांगापूर शिवारातील हा शेतरस्ता अनेक वर्षांपासून वादग्रस्त ठरला होता. रस्ता बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीपर्यंत पोहोचणे, शेतीमालाची वाहतूक करणे आणि दैनंदिन कृषी कामे करणे मोठ्या अडचणीचे झाले होते. या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महसूल प्रशासनाने पुढाकार घेतला. मंडळ अधिकारी सारिका हेडगे, तलाठी मीना शिंदे, पोलीस पाटील राजेभाऊ कापरे, सरपंच रमेश बोडके तसेच लगतच्या शेतकऱ्यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष घटनास्थळी बैठक घेण्यात आली. तब्बल चार तास सर्व संबंधितांशी सकारात्मक चर्चा करून सामंजस्याच्या माध्यमातून हा रस्ता मोकळा करण्यात आला.

कुपटा मंडळात एकूण १९ गावांचा समावेश असून मंडळ अधिकारी सारिका हेडगे यांनी यापूर्वीही अनेक गुंतागुंतीचे आणि वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले शेतरस्त्यांचे प्रश्न मार्गी लावले आहेत. कुपटा, हट्टा, वलंगवाडी, सोना, केमापूर, राव्हा, कानड, सिमनगाव, गव्हा, बोरगाव जहागीर, पारडी, कौसडी आणि राजुरा आदी गावांमध्ये जवळपास २५ ते ३० शेतरस्ते मोकळे करण्यात त्यांना यश आले आहे. महसूल विभागाच्या प्रभावी मध्यस्थीमुळे अनेक वर्षांपासून रखडलेले आणि शेतकरी वादाचे कारण ठरणारे प्रश्न सुटत असल्याचे दिसून येत आहे. भांगापूर शिवारातील रस्ता खुला झाल्यानंतर शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत महसूल विभागाचे आभार मानले.

महसूल प्रशासनाच्या शेतकरीहिताच्या या कार्याबद्दल मंडळ अधिकारी सारिका हेडगे, तलाठी मीना शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे परिसरातून कौतुक होत असून त्यांच्या कार्यपद्धतीचे नागरिकांनी स्वागत केले आहे..

सोलापूर तरुण भारत
arat.com, epaper.dainiktarunbharat.com
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# वातकुक्कुटांचा 'दिशा-शोध'

हवामानाचे अंदाज वर्तविणारे शास्त्र काळाबरोबर प्रगत होत गेले असले, तरी पारंपरिक पठडीबाज अंदाजशास्त्रांच्या आधारावर आजही काही आडाखे बांधले जातात; अनेकदा ते प्रगत हवामानशास्त्राच्या अंदाजाहूनही अचूक असतात, असे दिसून आले आहे. हवामानाचे अंदाज वर्तविणाऱ्या परंपरागत शास्त्रावर विसंबून हवामानातील बदलाचे आडाखे बांधण्याच्या प्रथांची मान्यता अजूनही टिकून आहे. जेव्हा विज्ञानाने आजच्याएवढी झेप घेतली नव्हती आणि शेकडो मैलावरचे वारे आपल्यापर्यंत पोहोचतील तेव्हा त्यांची दिशा कोणती असेल, याचा अंदाज वर्तविणारे वातकुक्कुट आजही अनेक ठिकाणी वाहत्या वाऱ्यांचे दिशादर्शक म्हणून काम करीत असतात. राजकारणात अनेकदा वादळाच्या शक्यता वर्तविल्या जातात, भूकंपाची भाकितेही केली जातात, प्रचंड उलथापालथ होण्याचे अंदाज व्यक्त केले जातात, तेव्हा त्यामागे अशाच काही पठडीबाज परंपरांच्या अनुभवाचाच आधार घेतला जातो. 'राजकारणात कोणीही कोणाचा कायमचा शत्रू किंवा कायमचा मित्र नसतो' या विचारास राजकारणात सुभाषिताचे स्थान प्राप्त झाले आहे. अशी वाक्ये जेव्हा कानावर येऊ लागतात, तेव्हा त्यामध्ये भविष्याचे काही संकेत लपलेले असतात, हे अनेकांस अनुभवाने ठावूक असते. काही वेळा भविष्यात कोणत्याही कोलांटउड्या वगैरे मारण्याची वेळ आलीच, तर त्यासाठी अगोदरच सोयीस्कर वातावरण तयार करून ठेवण्याची खबरदारी घ्यावी लागते.

दोन वर्षांपूर्वी मे २०२४ मधील लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या व चौथ्या टप्प्याच्या काळात महाराष्ट्राच्या आणि राष्ट्रीय राजकारणातील शरद पवार या दीर्घानुभवी नेत्याने केलेल्या एका वक्तव्याची तेव्हा फारशी दखल घेतली गेली नव्हती; किंबहुना अशा वक्तव्यांकडे फारशा गांभीर्याने पाहावयाचे नसते, असेच अनेकांना वाटू लागले. काँग्रेसची आणि आमची विचारधारा एकच आहे, आम्हीही गांधी-नेहरूंच्याच विचारांचे आहोत आणि गांधी-नेहरूंची विचारधारा बळकट करण्यासाठी प्रादेशिक पक्षांनी काँग्रेसमध्ये विलीन होणे हा एक मार्ग असू शकतो, असे शरद पवार यांनी एका वृत्तपत्रास दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते. भाजपाविरोधी पक्षांची ताकद वाढविण्यासाठी भाजपाविरोधी मतांचे विभाजन टाळावे हा त्यांच्या या मताचा गाभा होताच; पण प्रादेशिक पक्षांना सातत्याने सत्तेबाहेर राहण्याची वेळ आल्यास त्यांची संघटनात्मक ताकद कमी होऊन अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, ही त्यांची भीतीदेखील होती. शरद पवार यांचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार का, यावरच्या चर्चा रंगल्या होत्या. प्रगत विज्ञानाचे हवामानाचे आडाखेदेखील अनेकदा अचूक ठरत नाहीत, तेथे पठडीबाज परंपरांचे अंदाज तंतोतंत बरोबर येण्याची शक्यता नसते, हे खरेच असल्याने पवार यांच्या विधानानुसार तसे काही घडले तर नाहीच, पण माझा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार असे काही मी म्हणालो नव्हतो, असे सांगून पवारांनी स्वतःच दिलेले बदलाचे संकेत धुडकावूनही लावले होते. तेव्हा त्या चर्चेला पूर्णविराम मिळाला. काँग्रेसमधून बाहेर पडून वेगळी चूल मांडणाऱ्या प्रादेशिक पक्षांना काँग्रेसमध्ये विलीन होण्याबाबत पुनर्विचार करण्याकरिता प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने पवार यांना तेव्हा ते वक्तव्य केले असावे, असेही म्हणतात. पण तेव्हा ती वेळ चुकली. पवार यांनी तेव्हा वर्तविलेल्या भाकितामधून उघड होणारे संकेत आता मात्र भविष्यातील वादळे, भूकंप किंवा उलथापालथीची चिन्हे उघड करताना दिसत आहेत. पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसची वाताहत झाल्यानंतर या पक्षाची ज्या झपाट्याने शकले उडू लागली, तेव्हा पुन्हा एकदा तृणमूलच्या काँग्रेसमधील विलीनीकरणाची चर्चा सुरू झाली आणि त्याबरोबरच पुन्हा एकदा शरद पवार यांच्या पक्षाच्या भविष्याचे नवे आडाखेही बांधले जाऊ लागले आहेत. शरद पवारांच्या सुकन्या सुप्रिया सुळे यांच्या गळ्यात काँग्रेस भुवनमध्ये काँग्रेसच्या नेत्यांनी घातलेला काँग्रेसचा गमछा आणि त्याप्रसंगानंतर उडालेले हास्यविनोदाचे कारंजे भविष्याच्या आडाख्यांस खतपाणी घालणारे ठरू पाहात आहे. शरद पवार हे शब्दाचे पक्के आहेत, असे मानले जाते. त्यांच्या तोंडून बाहेर पडलेला शब्द कधी माघारी जात नाही, अशीही त्यांची ख्याती आहे. उलट, आपल्या तोंडून बाहेर पडलेल्या शब्दांचा विपर्यास होतो अशीच त्यांची अनेकदा तक्रार असते. त्यामुळे त्यांनी दोन वर्षांपूर्वी वर्तविलेल्या विलीनीकरणाच्या भाकितावरील त्यांचा विश्वास आजही ठामच असणार हे ओघानेच येते.

यामुळेच ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसप्रमाणेच शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस गटाच्या भवितव्याचे आडाखे आज बांधले जात असतील, तर ते अगदीच फोल ठरतील असे म्हणणे म्हणजे पवार यांच्या प्रदीर्घ अनुभवास दिले जाणारे आव्हान ठरू शकते. तसे होणार नाही याची काळजी सध्याच्या राजकीय वातावरणानेच घेतली असावी असे दिसते. १९९९ मध्ये शरद पवार यांनी काँग्रेसपासून फारकत घेतली त्याची कारणे वेगळी होती. पक्षनेतृत्वाविषयीच्या त्यांच्या काही भूमिकेमुळे त्यांना काँग्रेसने पक्षाबाहेरचा रस्ता दाखविला. त्यांनी स्वपक्षाची वेगळी चूल मांडली, पण त्यांनी गांधी-नेहरूंची विचारधारा सोडली नाही. तेव्हाही त्यांना भविष्यात कराव्या लागणाऱ्या तडजोडींचा अंदाज आलाच असावा. पुढे तो तंतोतंत खरा ठरला, कारण पुढे लगेचच महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात सत्ता स्थापन करण्यासाठी समान विचारधारेच्या जोरावरच त्यांचा पक्ष काँग्रेससोबत सत्तेसाठी तडजोड करू शकला आणि पुढे केंद्र सरकारातील सत्तेतही सहभागी होऊ शकला. अन्यथा, स्वबळावर कधीही सत्ता मिळवू न शकलेल्या शरद पवारांच्या पक्षास राजकारणात वळचणीला बसण्याची वेळ आली असती. ती तशी येऊ नये, यासाठी त्यांनी तेव्हा विचारधारेला धरून ठेवण्याचा निर्णय घेतला असावा. भविष्यात आपण कधीही काँग्रेसमध्ये जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी वेगळ्या पक्षाची स्थापना करतानाच दिली होती, हे अनेकांस आठवत असेल. गेल्या काही दिवसांत मात्र काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या पक्षांनी पुन्हा स्वगृही दाखल व्हावे आणि राहुल गांधी यांचे नेतृत्व स्वीकारून भाजपाविरोधी ताकद वाढवावी यासाठी काँग्रेसमधूनच प्रयत्न सुरू झाले आणि महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांनी शरद पवार गटाच्या विलीनीकरणाच्या संकेतास दुजोरा देण्यास सुरुवातही केली. यात भर म्हणून, सध्याच्या विरोधकांच्या राजकारणात दुय्यम स्थानावर असलेल्या उद्धव ठाकरेंच्या गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनीही त्या चर्चेत हवा भरण्याचे काम केले आहे. असे काही संकेत मिळतात, तेव्हा राजकारणाच्या तंबूवर बसलेला वातकुक्कुट नव्या राजकीय वाऱ्यांच्या दिशेचा अंदाज घेत असतो हे उघड आहे. ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू झाल्यानंतर आणि खासदारांच्या बैठकीतील हवा निघाल्यावर चर्चा सुरू झाल्यानंतर आता अयोध्येतील रामललाचे दर्शन घेऊन माफी मागण्याचे राऊत यांनी जाहीर केले आहे. त्यांचे हे वक्तव्यदेखील राजकारणाच्या नव्या दिशेने वाहणाऱ्या वाऱ्यांचे वेगळे संकेत असावे, असे आडाखे बांधले जात आहेत. तिकडे केंद्रात तृणमूल काँग्रेसमधून फुटलेल्या खासदारांनी नव्या राजकारणाचे संकेत दिलेले असताना, महाराष्ट्रातील वातकुक्कुट अजूनही वाऱ्यांच्या दिशेचा अंदाज घेत असल्याने वादळ, भूकंप, पडझड यापैकी काहीतरी नक्की घडणार आहे, एवढेच भाकीत वर्तविणे तूर्तास सावधगिरीचे ठरेल. ■

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# होर्मुझचे रणांगण विनाश न ठरावे!

जगाच्या पाठीवर काही असे भौगोलिक प्रदेश आहेत, ज्यांच्यावर ताबा मिळवणे किंवा वर्चस्व गाजवणे म्हणजे संपूर्ण जागतिक व्यवस्थेची नाडी आपल्या हातात ठेवण्यासारखे आहे. मध्यपूर्वेतील होर्मुझची सामुद्रधुनी हे अशाच एका अत्यंत संवेदनशील आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण भू-राजकीय केंद्राचे नाव आहे. आजच्या घडीला या चिंचोळ्या सामुद्रधुनीला 'होर्मुझचे रणांगण' म्हटले, तर ते वावगे ठरणार नाही. कारण इथे केवळ प्रादेशिक सत्ताच नव्हे, तर जगातील महासत्तांचे हितसंबंध एकमेकांशी थेट धडकताना दिसत आहेत. त्यामुळेच आज संपूर्ण जगाला एकाच प्रश्नाने ग्रासले आहे, तो म्हणजे महासत्तांच्या या संघर्षात खरोखरच जगाचे भविष्य अडकले आहे का? होर्मुझचा संघर्ष नेमका काय आहे हे समजून घेण्यासाठी आधी होर्मुझचे भौगोलिक आणि आर्थिक महत्त्व समजून घेणे गरजेचे आहे. ओमान आणि इराण यांच्या दरम्यान असलेली ही सामुद्रधुनी एका बाजूला पर्शियन आखात आणि दुसऱ्या बाजूला ओमानचे आखात व अरबी समुद्राला जोडते. या समुद्राच्या पट्टीची रुंदी सर्वांत अरुंद ठिकाणी केवळ ३३ किलोमीटर आहे, तर जहाजांच्या वाहतुकीसाठी उपलब्ध असलेला मार्ग केवळ तीन ते चार किलोमीटर रुंद आहे. जगातील एकूण खनिज तेल वाहतुकीपैकी सुमारे २० ते २५ टक्के वाहतूक एकट्या होर्मुझमधून होते. सौदी अरेबिया, इराक, संयुक्त अरब अमिराती (यूएई), कुवेत आणि कतार यांसारख्या प्रमुख तेल उत्पादक देशांचा तेल पुरवठा याच मार्गावर अवलंबून आहे. जगातील एलएनजी उत्पादनात आघाडीवर असलेला कतारही बहुतांश वायुपुरवठा याच मार्गाने करतो.

भारत, चीन, जपान आणि दक्षिण कोरियासारख्या आशियाई महासत्तांच्या ऊर्जा सुरक्षेची गुरुकिल्ली या होर्मुझच्या मार्गात दडली आहे. थोडक्यात सांगायचे, तर होर्मुझची सामुद्रधनी जागतिक अर्थव्यवस्थेचा 'हार्ट बीट' आहे. हा श्वास काही काळासाठी थांबला, तर संपूर्ण जगाला 'आर्थिक हृदयविकाराचा झटका' बसू शकतो. होर्मुझचे रणांगण तापण्याला प्रामुख्याने अमेरिका आणि इराण यांच्यामध्ये दशकांपासून चाललेला संघर्ष कारणीभूत आहे; मात्र आता यात चीन आणि रशिया या इतर दोन महासत्तांची उडी पडल्यामुळे हा प्रादेशिक वाद आता जागतिक शीतयुद्धाच्या नव्या आवृत्तीत बदलला आहे. अमेरिकेने नेहमीच होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अप्रत्यक्ष लष्करी नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. बहरीनमध्ये असलेला अमेरिकेचा 'पाचवा नौदल ताफा' याच भागावर लक्ष ठेवून असतो. आंतरराष्ट्रीय व्यापार मार्ग खुला ठेवणे हे अमेरिकेचे अधिकृत उद्दिष्ट असले, तरी मध्यपूर्वेतील आपल्या मित्रदेशांचे (सौदी अरेबिया, इस्रायल) रक्षण करणे आणि इराणला रोखणे हा यामागचा मुख्य हेतू आहे. इराण भौगोलिकदृष्ट्या होर्मुझच्या संपूर्ण उत्तरेकडील किनारपट्टीवर नियंत्रण ठेवतो. जेव्हा जेव्हा अमेरिकेकडून इराणवर आर्थिक निर्बंध लादले जातात किंवा लष्करी दबाव आणला जातो, तेव्हा इराणकडून होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्याची धमकी दिली जाते. इराणकडे असलेले आधुनिक ड्रोन्स, नौदलाच्या छोट्या पण घातक बोटी आणि समुद्रात पेरल्या जाणाऱ्या सुरुंगांच्या जोरावर इराण या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत करू शकतो.

या संघर्षात आता चीन आणि रशियाने इराणची बाजू घेतल्याने समीकरणे बदलली आहेत. चीन हा जगातील सर्वांत मोठा तेल आयातदार देश आहे आणि त्याचे ७० टक्क्यांहून अधिक तेल मध्यपूर्वेतून येते. चीनने इराणसोबत २५ वर्षांचा धोरणात्मक करार केला आहे. दुसरीकडे, युक्रेन युद्धानंतर रशियावर पाश्चात्त्य देशांनी घातलेल्या निर्बंधांमुळे रशिया आणि इराणचे लष्करी संबंध कमालीचे दृढ झाले. इराण, रशिया आणि चीन या तिघांनी ओमानच्या आखातात आणि अरबी समुद्रात अनेकदा संयुक्त नौदल सराव केले आहेत. हा सरळ सरळ अमेरिकेच्या वर्चस्वाला दिलेला इशारा आहे. गेल्या काही वर्षांमध्ये होर्मुझच्या परिसरात अनेक हिंसक आणि चिंताजनक घटना घडल्या आहेत. त्यामुळे हे क्षेत्र कधीही पेटू शकणाऱ्या दारूगोळ्याच्या कोठारासारखे झाले आहे. इस्रायल-हमास संघर्ष आणि त्यानंतर लाल समुद्रात हुथी बंडखोरांनी केलेल्या धुमाकुळानंतर होर्मुझवरही थेट परिणाम पाहायला मिळाला आहे. इराणने अनेक पाश्चात्त्य किंवा इस्रायलशी संबंधित व्यापारी जहाजे जप्त केली आहेत. इस्रायल आणि इराण यांच्यातील थेट संघर्षाने आता मर्यादा ओलांडल्या आहेत. इराणवरील इस्रायलच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराण होर्मुझच्या सामुद्रधनीचा वापर एक शस्त्र म्हणून करत आहे. २०१५ मधील इराण अणुकरार अमेरिकेने मोडीत काढल्यापासून इराणने आपले युरेनियम संवर्धन प्रचंड वाढवले आहे. इराण अणुबॉम्ब बनवण्याच्या जवळ पोहोचल्याची भीती पाश्चात्त्य देशांना आहे. भारताची सुमारे ८० ते ८५ टक्के तेलाची गरज आयातीतून भागते. त्यातील मोठा वाटा पर्शियन आखातातून येतो. तसेच, मध्यपूर्वेतील देशांमध्ये ८० लाखांहून अधिक भारतीय नागरिक राहतात. ते भारताला दरवर्षी अब्जावधी डॉलर्सचे परकीय चलन पाठवतात. भारताचे अमेरिकेशी धोरणात्मक संबंध आहेत, इस्रायलशी घट्ट मैत्री आहे आणि इराणसोबत चाबहार बंदराच्या माध्यमातून ऐतिहासिक आणि आर्थिक ऋणानुबंध आहेत. त्यामुळे भारत कोणत्याही एका गटात सामील न होता शांततेचा पुरस्कार करतो. होर्मुझच्या समुद्रात भारतीय व्यापारी जहाजांच्या सुरक्षेसाठी भारतीय नौदलाने 'ऑपरेशन संकल्प' अंतर्गत आपल्या युद्धनौका तैनात केल्या आहेत. भारत इराणच्या चाबहार बंदराचा विकास करत आहे, जेणेकरून होर्मुझला वळसा घालून 'इंटरनॅशनल नॉर्थ-साऊथ ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर' (आयएनएसटीसी)च्या माध्यमातून रशिया आणि मध्य आशियाशी जोडले जाता येईल. होर्मुझच्या संघर्षातून जगाची सुटका करायची असेल, तर महासत्तांना आपल्या साम्राज्यवादी आणि वर्चस्ववादी मानसिकतेतून बाहेर यावे लागेल. अमेरिका आणि इराण यांनी पुन्हा एकदा चर्चेसाठी समोर येणे गरजेचे आहे. आर्थिक निर्बंध आणि लष्करी धमक्यांमुळे प्रश्न सुटण्याऐवजी गुंतागुंतीचा होत चालला आहे. जगाने आता जीवाश्म इंधनावरील आपले अवलंबित्व कमी करून सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि हायड्रोजन यांसारख्या अक्षय ऊर्जेकडे वेगाने वळणे गरजेचे आहे. जगाची ऊर्जेची भूक मध्यपूर्वेतील तेलावर अवलंबून राहील, तोपर्यंत होर्मुजसारखी रणांगणे जगाला ओलिस धरत राहतील. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# तुकाराम मुंढेंचा धसका, पण...

प्रशासनातील एखादा अधिकारी धडक कारवाया करतो, नियमांची कठोर अंमलबजावणी करतो आणि भ्रष्टाचार, गैरव्यवहार किंवा बेकायदेशीर धंद्यांविरोधात मोहीम उघडतो तेव्हा सामान्य नागरिकांच्या मनात आशेचा किरण निर्माण होतो. महाराष्ट्रात अनेक वेळा काही अधिकाऱ्यांनी आपल्या कठोर कार्यपद्धतीमुळे जनतेचा विश्वास संपादन केला. अशा अधिकाऱ्यांच्या नावाने गैरव्यवहार करणार्यांमध्ये धास्ती निर्माण होते. मात्र केवळ एखाद्या अधिकाऱ्याची धडक कारवाई यामुळेच व्यवस्था सुधारते का हा खरा प्रश्न आहे. अन्न व औषध प्रशासन, महसूल, पोलिस, नगरपालिकांपासून ते विविध नियामक विभागांपर्यंत ही स्थिती कमी-अधिक प्रमाणात आढळते. एखाद्या अधिकाऱ्याने गुटखा माफियांवर, भेसळखोरांवर किंवा अवैध व्यवसायांवर कारवाई केली की दुसऱ्याच दिवशी त्याच व्यवसायांचे जाळे पुन्हा कार्यरत झाल्याचे दिसते. कारण कारवाई होते ती वरवर, पण मुळावर घाव घातला जात नाही. गुटखाबंदीचे उदाहरण घ्या. महाराष्ट्रात गुटखा विक्रीवर बंदी आहे. दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा गुटखा जप्त केला जातो. मोठमोठ्या बातम्या झळकतात. पण प्रश्न असा आहे की जप्त होणारा गुटखा येतो कुठून, त्याला संरक्षण कोण देतो, त्याची वाहतूक कोणाच्या आशीर्वादाने होते, या प्रश्नांची उत्तरे मात्र अनेकदा अंधारातच राहतात. त्यामुळे कारवाईचे श्रेय प्रशासनाला मिळते, पण अवैध व्यवसाय मात्र सुरूच राहतो. अन्न भेसळीचेही तसेच आहे. सणासुदीच्या काळात मिठाईची दुकाने, दुग्धजन्य खाद्यपदार्थ, खवा, पनीर, उत्पादकांवर धाडी टाकल्या जातात. निकृष्ट माल जप्त केला जातो. काहींवर गुन्हे दाखल होतात. पण काही दिवसांनी पुन्हा तेच प्रकार सुरू होतात. कारण दोषींना शिक्षा होण्याची प्रक्रिया संथ असते. त्यामुळे कायद्याची भीती निर्माण होत नाही.

नियमांचे पालन करणारे कर्तव्यदक्षअधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदी सूत्रे हाती घेताच राज्यभरात बेकायदेशीर भेसळयुक्त पदार्थांविरोधात धडाकेबाज कारवाई सुरू केली आहे. त्यांच्या धडक मोहिमेमुळे गुटखा माफिया, भेसळखोर, नियम मोडणाऱ्या दुकानदारांचे धाबे दणाणले आहेत. गुटखा माफिया, प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला विक्रेत्यांवर आता महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा मकोका लावला जाईल. केवळ किरकोळ विक्रेतेच नाही तर उत्पादकापासून पुरवठा साखळीतील प्रत्येकावर ही कडक कारवाई होणार आहे. महाराष्ट्रात दरवर्षी गुटख्यामुळे मुख कर्करोग होणाऱ्यांचे प्रमाण प्रचंड असल्याने सार्वजनिक आरोग्यासाठी हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. कोट्यवधी रुपयांचा माल जप्त करून गुन्हेगारांना अटक केली आहे. गेल्या महिनाभरात अन्न व औषध प्रशासनाने राज्यभरात शेकडो ठिकाणी छापे मारले आहेत. एकाच दिवसाच्या मोठ्या कारवाईत सुमारे ४ कोटी रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आणि २१ जणांना अटक केली. आतापर्यंत विविध कारवायांमध्ये ३५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल झाले असून ३ कोटी २७ लाखांपेक्षा जास्त मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मे महिन्यात केलेल्या कारवाईत एकाच दिवसात ३३ आरोपींना अटक करून २८ दुकाने, आस्थापना सील करण्यात आल्या होत्या. मुंबईतील मुलुंड भागात अत्यंत अस्वच्छ पाणीपुरीचे साहित्य तयार करणाऱ्या गुप्ता चणा भंडार या दुकानाला टाळे ठोकण्यात आले. १ जून ते ५ जून या कालावधीत राज्यभर राबविलेल्या या विशेष मोहिमेत प्रशासनाने १९५ ठिकाणी अचानक धाडी टाकल्या. या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याची एकूण किंमत १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ रुपये इतकी आहे. राज्यातील भेसळखोरांविरुद्ध तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या धडक कारवाईच्या भीतीचा गैरफायदा घेऊन भिवंडीतील शांतीनगर परिसरात गेल्या काही दिवसापासून काही महिला आणि पुरुषांची एक टोळी फिरत होती. ते स्वतःला अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी असल्याचे सांगत होते. ही टोळी हॉटेल, खानावळी आणि घाऊक किराणा व्यापार्यांकडे जात असत. तुमच्यावर केस करून दुकान सील करू अशी धमकी ते द्यायचे. तुकाराम मुंढे यांच्या कडक शिस्तीमुळे व्यापारी आधीच घाबरलेले होते. याच भीतिपोटी दुकानदारांनी कारवाई टाळण्यासाठी या तोतया टोळीला लाखो रुपये दिले. अशा टोळींना अटक करून कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा आंधळं दळतं आणि कुत्रं पीठ खातं अशी प्रशासनाच्या कारवाईची स्थिती होईल. ■

९८८१७१७८२८

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# 'पॉश' कायद्याच्या अंमलबजावणीची गरज

नाशिक येथील 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस'मधील उघड झालेल्या 'कॉर्पोरेट जिहाद'च्या माध्यमातून हिंदू महिलांचे योजनाबद्ध स्वरूपात धर्मांतर घडवून आणण्याच्या प्रकरणाची 'राष्ट्रीय महिला आयोगा'ने गांभीर्याने दखल घेतली. 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस' म्हणजेच, 'टीसीएस'च्या उच्च व्यवस्थापनाला या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, कंपनीच्या प्रत्येक आस्थापना-शाखेत 'पॉश' म्हणजेच, 'प्रीव्हेन्शन ऑफ सेक्युअल हरासमेंट ॲक्ट'च्या तरतुदींचे अधिक प्रभावीपणे पालन करण्यासाठी या कायद्यांतर्गत उचित व त्वरित कारवाईसाठी तातडीने व पुरेशी कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

'टीसीएस'च्या नाशिक कार्यालयांतर्गत 'लव्ह जिहाद'च्या जाळ्याआड महिला सहकारी-कर्मचाऱ्यांचे त्यांच्याच पुरुष सहकार्यांनी शारीरिक शोषण करून धर्मांतरणाचा प्रयत्न केला. या प्रकरणी संबंधित व्यवस्थापकाची भूमिका फूस लावणारी व संशयास्पद असल्याचे स्पष्ट झाल्याने 'कॉर्पोरेट लव्ह जिहाद' स्वरूपातील हे प्रकरण अद्याप गाजत आहे. या संदर्भातील प्राथमिक चौकशीत स्पष्ट झालेली बाब म्हणजे, कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांशी निगडित व महत्त्वाची बाब म्हणजे, 'टीसीएस'सारख्या विख्यात व प्रस्थापित कंपनीमध्ये महिलांसाठी असणाऱ्या 'पॉश' कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नाशिक कार्यालयासाठी आवश्यक अशी अंमलबजावणी यंत्रणाच नव्हती व या महत्त्वपूर्ण कायद्याच्या अंमलबजावणीचे काम पुणे येथील कार्यालयातून होत असल्याची आश्चर्यकारक बाब स्पष्ट झाली होती. याच मुद्याची दखल घेत, आता 'राष्ट्रीय महिला आयोगा'ने 'टीसीएस' कंपनीच्या व्यवस्थापनाला कंपनीच्या देशांतर्गत कार्यरत असणाऱ्या सर्व १२६ कार्यालये-आस्थापनांमध्ये 'पॉश' कायद्याच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून, आवश्यक कारवाईचा भाग म्हणून प्रत्येक आस्थापना स्तरावर स्वतंत्र अंमलबजावणी समितीसह आवश्यक ती कारवाई तातडीने करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

मुख्य म्हणजे, राष्ट्रीय महिला आयोगाने 'टीसीएस'ला एक महिन्याची मुदत दिली आहे. याचाच अर्थ, या कालबद्ध स्वरूपात 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस'ला आपल्या सर्व आस्थापनांमध्ये 'पॉश' अंतर्गत केवळ कारवाईच नव्हे, तर कर्तव्यपूर्ती करायची आहे. या संदर्भातील अन्य विशेष बाब म्हणजे, या प्रकरणाची पहिली सुनावणी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या उपस्थितीत झाली. यावरून राष्ट्रीय महिला आयोग स्तरावर विषयाचे गांभीर्य विशेष गांभीर्याने घेतल्याचे स्पष्ट होते.



याप्रसंगी 'टीसीएस' व्यवस्थापनाचे वरिष्ठ प्रतिनिधी आयोगाच्या पूर्वपरवानगीने आभासी स्वरूपात उपस्थित होते. याशिवाय, यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाच्या मुख्य अतिरिक्त आयोगाच्या अतिरिक्त सचिव राधिका चक्रवर्ती यांच्यासह 'टीसीएस', नाशिक प्रकरणी नेमण्यात आलेल्या 'सत्यशोधन समिती'चे सदस्यपण उपस्थित होते.

चौकशीच्या पहिल्याच टप्प्यात पुढे आलेला तपशील व झालेल्या चर्चेत राष्ट्रीय महिला आयोगाला 'टीसीएस'च्या नाशिक कार्यालयात 'पॉश' कायद्याच्या महत्त्वपूर्ण तरतुदींच्या संदर्भात त्रुटी आढळल्या. यामध्ये चौकशीच्या वेळी 'टीसीएस'च्या नाशिक कार्यालयातील 'एचआर' व्यवस्थापकाची अनुपस्थिती व सामान्य कर्मचाऱ्यांसह महिला कर्मचाऱ्यांसाठी तक्रार निवारण धोरण व पद्धती याची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून आले. तसेच कंपनीच्या नाशिक कार्यालयात 'पॉश' कायद्यांतर्गत महिला कर्मचार्यांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक व कायदेशीर स्वरूपाची समितीसुद्धा अस्तित्वात नाही, यांसारख्या महत्त्वाच्या त्रुटींची नोंद राष्ट्रीय महिला आयोगाने घेतली. यासंदर्भात 'टीसीएस' व्यवस्थापनातर्फे कंपनीच्या नाशिक व पुणे कार्यालयांसाठी मिळून 'पॉश' कायद्याच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी एकच अंतर्गत समिती असल्याचे स्पष्ट केले. ही बाब अर्थातच कायद्यांतर्गत पुरेशी नव्हती.

महिलांच्या काम आणि कामाच्या ठिकाणच्या सुरक्षिततेच्या संदर्भात व कायदेशीरदृष्ट्या विशेष महत्त्वाच्या तरतुदींचे 'टीसीएस'मध्ये पालन होत नसल्याचे सकृद्दर्शनी आढळून आले. त्यावर राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी यासंदर्भात व्यक्त केलेल्या भूमिकेतून स्पष्टपणे नमूद केले की, कंपन्या आणि व्यवस्थापनांनी 'पॉश' कायद्याच्या तरतुदींचा अंमल आणि अंमलबजावणीकडे केवळ कायद्याची केलेली पूर्तता याच दृष्टीने न बघता, महिला कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील हा कायदा व त्यातील तरतुदींच्या अंमलबजावणीकडे प्रामुख्याने प्रकर्षाने नैतिक, कायदेशीर व व्यवस्थापन म्हणून कंपन्यांनी जबाबदारीच्या भूमिकेतून पाहणे नितांत गरजेचे ठरते.

याच वेळी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षांनी असे स्पष्टपणे नमूद केले की, महिला कर्मचारी कामाच्या ठिकाणी सर्वार्थाने शारीरिक शोषणापासून मुक्त ठेवण्यासाठी प्रत्येक व्यवस्थापनाने आपापल्या ठिकाणी 'पॉश' कायद्याच्या सर्वच तरतुदींची संपूर्णपणे व पुरतेपणी अंमलबजावणी करणे, त्यांची महत्त्वाची व्यवस्थापकीय जबाबदारी म्हणून पार पाडायला हवी. एवढेच नव्हे, तर 'टीसीएस' नाशिकमध्ये महिला कर्मचाऱ्यांशी यबंधित गंभीर घटना घडूनसुद्धा 'टीसीएस'च्या उच्चपदस्थांपैकी कुणीच नाशिक कार्यालयाला भेट देऊन संबंधित महिला सहकार्यांशी संवाद कसा साधला नाही? हा प्रश्नही रोखठोकपणे विचारण्यात येऊन, अशा प्रत्येक प्रसंगी गंभीर व ठोस भूमिका घेण्यावर भर दिला. अशा प्रसंगी पीडित महिला कर्मचाऱ्यांना संवाद, सहानुभूती व सहकार्याची भूमिका व्यवस्थापनाने घेण्यावर राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी ठामपणे भूमिका घेतली, हे विशेष महत्त्वाचे.

'टीसीएस' नाशिकमधील गाजलेल्या कॉर्पोरेट लव्ह जिहाद'प्रकरणी तातडीने दखल घेत, राष्ट्रीय महिला आयोगाने आपल्या प्राथमिक अहवालात, 'टीसीएस'चे संचालन करणाऱ्या 'टाटा उद्योग समूहा'च्या देशातील औद्योगिक विकासासह सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेत असतानाच, महिला सुरक्षाविषयक; पण ठोस भूमिका घेण्यावर जोर दिला आहे.

'टीसीएस' नाशिक प्रकरणाचा आपला प्राथमिक अहवाल राष्ट्रीय महिला आयोगाने राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आपल्या महत्त्वपूर्ण निरीक्षणांसह सादर केल्याने नाशिकच्या 'कॉर्पोरेट जिहाद'प्रकरणी 'पॉश' व पोलिस या उभय तरतुदींनुसार तातडीने कारवाईला निश्चितपणे गती मिळेल, असा विश्वास आहे. ■

(लेखक 'एचआर' व्यवस्थापक व सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### जी-२० अंतर्गत उभारलेल्या पुतळ्यांची दुरवस्था

नागपुरात मार्च २०२३ मध्ये जी-२० अंतर्गत जी परिषद झाली होती त्याकरिता नागपूर सुशोभित करण्यात आले होते. कोट्यवधी रुपये खर्च करून नागपूर शहर अत्यंत सुंदर केले होते. विविध चौक, उड्डाणपूल यांच्याखाली ऐतिहासिक प्रसंगाचे फायबर पुतळे स्थापित केले होते. आज त्यांची अवस्था अत्यंत खराब आहे. त्यावर धूळ, अवतीभवती कचरा, जी झाडे लावली ती पाण्याअभावी मृत झाली. काही नागरिकांनी ती चोरून नेली हे सुद्धा दिसले होते. सरकारकडून इतका खर्च करून हे सुशोभीकरण करण्यात आले होते. त्याची योग्य निगा राखणे हे स्थानिक प्रशासन व नागरिकांचे कर्तव्य आहे. परंतु हे होताना दिसत नाही याचे वाईट वाटते. स्थानिक प्रशासनाने याबाबत त्वरित पुढाकार घेऊन योग्य कार्यवाही करावी.

**मोहन पांडे**/नागपूर

* * *

### तंत्रज्ञान आणि अध्यात्माची सांगड

आजचे युग हे संपूर्णपणे तंत्रज्ञानाचे युग आहे. मानवी इतिहासात कधी नव्हे इतकी प्रचंड आणि वेगवान प्रगती आपण गेल्या काही दशकांत अनुभवली आहे. आज एका बोटाच्या इशाऱ्यावर जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील व्यक्तीशी संपर्क साधणे शक्य झाले आहे. इंटरनेटच्या माध्यमातून अथांग माहितीचा साठा आपल्या मुठीत सामावला आहे. शिक्षण, व्यापार, वैद्यकीय क्षेत्र आणि मनोरंजन या सर्वच पातळ्यांवर तंत्रज्ञानाने माणसाचे जीवन अत्यंत सोयीस्कर, सुटसुटीत आणि वेगवान बनवले आहे. भौतिक सुबत्ता आणि साधनांच्या बाबतीत आजचा माणूस समृद्धीच्या शिखरावर पोहोचला आहे. निसर्गावर मात करत माणसाने विश्वाची दारे खुली केली आहेत, ही तंत्रज्ञानाची मानवी संस्कृतीला मिळालेली सर्वांत मोठी आणि सकारात्मक देणगी आहे.

परंतु, या नाण्याच्या दुसऱ्या बाजूचा विचार केला तर एक गंभीर वास्तव आपल्यासमोर उभे राहते. तंत्रज्ञानाने बाह्य जग जितके जवळ आणले, तितकाच माणूस आपल्या

## वाचक पत्रे

माणसांपासून आणि स्वतःच्या मनापासून दूर जात चालला आहे का, असा प्रश्न आज पडू लागला आहे. आज घराघरांमध्ये एकाच छताखाली राहणारे लोक एकमेकांशी बोलण्याऐवजी आपापल्या साधनांमध्ये व्यस्त असतात. या पृष्ठभूमीवर आपल्याला तंत्रज्ञान आणि अध्यात्म यांच्यातील अनुबंध समजून घ्यावा लागेल. अनेकदा तंत्रज्ञान आणि अध्यात्म यांना परस्परांच्या विरोधी मानले जाते. तंत्रज्ञान म्हणजे भौतिक प्रगती आणि अध्यात्म म्हणजे जगाचा त्याग, असा एक चुकीचा समज समाजात रूढ आहे. परंतु, वास्तव तसे नाही. हे दोन्ही विचार परस्परांना छेद देणारे नसून, ते मानवी जीवनाला परिपूर्ण करणारे परस्परपूरक घटक आहेत. तंत्रज्ञान माणसाला बाह्य जगाशी जोडते, तर अध्यात्म माणसाला त्याच्या स्वतःच्या मनाशी जोडते. बाह्य जगातील प्रगतीचा आनंद घेताना, अंतर्गत मनाची श्रीमंती जपणे हेच आजच्या काळातील सर्वांत मोठे आव्हान आणि कर्तव्य आहे. ज्या दिवशी आपण बाह्य प्रगती आणि अंतर्मनाचा हा समतोल साधू, त्याच दिवशी खऱ्या अर्थाने एका समाधानी, सुखी आणि प्रगतिशील मानवी संस्कृतीचा उदय होईल. हाच समतोल आजच्या आणि उद्याच्या पिढीला खऱ्या आनंदाकडे नेणारा राजमार्ग ठरेल.

**वीरेंद्र सोनवणे**/८८८८२४४८८३

* * *

### पार्किंग समस्या सोडवणे आवश्यक

तरुण भारत आमचं पुणे पुरवणी १३ जूनमधील 'छ. संभाजी महाराज पार्किंगची पुनर्बांधणी' ही पार्किंग क्षमता वाढवण्याची सकारात्मक बातमी वाचून दिलासा मिळाला. खरे तर हा आनंदऋषीजी चौकातील उड्डाणपूल पुन्हा बांधण्यासारखा प्रकार झाला. पण 'देर आये दुरुस्त आये' असं म्हणायला हरकत नाही. कारण वाहनांच्या आकार-प्रकारांचा विचार न करता बांधलेल्या अभियांत्रिकी बहुमजली पार्किंगचा पूर्ण क्षमतेने उपयोग न होता, रस्त्यावरच वाहने लावणे ही स्मार्ट शहरासाठी नामुष्कीच म्हणावी लागेल. त्यातही सर्व प्रमुख रस्त्यांवर 'पे ॲण्ड पार्क'च्या प्रस्तावांचा प्रवास हा आजपर्यंत केवळ अडथळ्यांनीच भरलेला आहे. त्याच्यासाठीच्या निविदांना प्रतिसादच मिळेनासा झालाय. त्यामुळे या पुनर्बांधणीबरोबरच महानगरपालिकेने पुढील पर्यायांचाही विचार करावा. मुख्य व गजबजलेल्या रस्त्यांवर व्यावसायिकांना महिन्याचा सवलत पास देता येईल का, नागरिकांसाठी ठरावीक पार्किंग स्लॉट ठरवता येतील का, मनपा बहुमजली वाहनतळांच्या कंत्राटदारांच्या मनमानी पार्किंग भाडे वसुलीच्या तक्रारी निर्भीडपणे करता येऊन त्यांची दखल घेऊन अशा कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकता येईल का, हे सारे विचारात घेऊन मनपाच्या नव्या कारभाऱ्यांनी या तातडीच्या प्रश्नावर कार्यवाही करावी असे वाटते.

उपनगरांतील अंतर्गत रस्त्यांवर दोन्ही बाजूला केले जाणारे पार्किंग रहदारीसाठीचा रस्ता अधिकच चिंचोळा करते. त्यावरही सम/विषम तारखांप्रमाणे फक्त एका बाजूला पार्किंग करण्यावर कटाक्ष ठेवला पाहिजे. ■

**श्रीपाद कुलकर्णी**/ पुणे. ९४२२५१५६४०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गेवराईचा तहसीलदारच वाळूमाफिया, घरकुलाच्या नावाखाली 25 हजार ब्रास वाळूची तस्करी, 30 अधिकाऱ्यांवर निलंबनाची टांगती तलवार

**बीड :** विविध घटनांनी चर्चेत असलेल्या बीड जिल्ह्यात प्रशासनाचा क्रूर चेहरा समोर आला आहे. अंबडचा तहसीलदार वाळूमाफियाकडून लाच घेताना जेरबंद झाला. तर गेवराईच्या तहसीलदाराने महसूल प्रशासन दावणीला बांधून २५ हजार ब्रास वाळू फस्त केली. दस्तुरखुद्द जिल्हाधिकाऱ्यांनाही वाळूचोरीची भनक लागली नाही, स्थानिक आमदारांनी आवाज उठवल्यावर जिल्हाधिकारी अक्शन मोडवर आले. वाळू घाट बंद झाल्यावर ड्रोनच्या माध्यमातून वाळू घाटाची तपासणी मोहीम राबवली. १५ तलाठी, १५ ग्रामसेवकांसह अनेक अधिकारी, ठेकेदारांच्या चौकशीत गोदापात्रातून १८ कोटींची वाळू चोरल्याचे उघड झाले. त्यामुळे गेवराई तहसीलदारांसह बड्या अधिकाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या. तहसीलदाराला सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले असून, गोदापात्र ओरबाडणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची टांगती तलवार आहे.

## घरकुलाची वाळू जिल्हाभर विकली

बीड जिल्ह्यातील गेवराई आणि माजलगाव तालुक्यांत १४ वाळू घाट मंजूर आहेत. पैकी माजलगाव तालुक्यात १ आणि गेवराई तालुक्यात ५ वाळू घाटातून टेंडर प्रक्रिया झाली. गेवराईतील ५ पैकी ३ घाट बंदच राहिले. केवळ सावरगाव आणि बोरगाव घाटातून वाळू उपसा झाला. यावर्षी तालुक्यात ७०० घरकुल बांधकामासाठी शासनाकडून वाळू देण्याचे सरकारचे धोरण असल्यामुळे टेंडर झालेल्या ५ पैकी एका घाटावरून वाळू देणे आवश्यक होते. मात्र गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांनी या घाटात वाळू उपलब्ध नसल्याचे दाखवत घरकुलांसाठी राक्षसभुवन येथून अनधिकृतपणे २५ हजार ब्रास वाळू उपसली. मात्र, ती घरकुलासाठी न वापरता १५ तलाठी आणि १५ ग्रामसेवकांच्या संगनमताने घस्कुल लाभार्थ्यांकडून ओटीपी घेत बनावट ईटीपी पावत्या तयार करून ती जिल्ह्यात आणि जिल्ह्याबाहेर विकली.



## तहसीलदार, कर्मचाऱ्यांसह 15 दलालांवर थेट कारवाई होणार - जॉन्सन

गेवराई तालुक्यातील गोदापात्रातील राक्षसभुवन येथील वाळू घोटाळ्यात कारवाईचा फास अधिक घट्ट होताना दिसत आहे. घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांच्या नावाचा गैरवापर करून अवैध वाळू उपसा प्रकरणात जिल्हाधिकारी कार्यालयात दोन दिवस तहसीलदारांसह सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांची चौकशी करून सुनावणी झाली. यानंतर आता जिल्हाधिकारी अक्शन मोडमध्ये आले. त्यांनी असे म्हटले आहे की, तलाठी, कंत्राटी कर्मचारी आणि १५ दलालांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. तपासणीत २५० लाभार्थ्यांनी आम्हाला कोणतीही वाळू मिळाली नसल्याचा जवाब दिला आहे. कागदोपत्रातली नोंदी आणि वास्तव यात तफावत असल्याचे म्हणत जे जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई होणार असल्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी म्हटले आहे.

पहाटे सहा ते सायंकाळी सहापर्यंतच वाळू उपसा करण्याची अट असताना दिवसरात्र वाळू उपसा झाला. स्थानिक आमदारांच्या तक्रारीनंतर जिल्हा प्रशासनाला जाग आली. ऐन घाट बंद व्हायच्या वेळी हा प्रकार घडल्याने जिल्हा प्रशासनाने अतिरिक्त जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्या नेतृत्वाखाली चौकशी समिती नेमली. चौकशीनंतर गेवराईच्या तहसीलदारांसह कर्मचारी दोषी असल्याचे आढळून आले. जिल्हाधिकारी विवेक जॉ न्सन यांनी तातडीने खोमणे यांना सक्तीच्या रजेवर पाठवले. दोषींवर मंगळवारपासून गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. यात गेवराईचे तहसीलदार सुरेश खोमणे यांच्यासह तलाठी, ग्रामसेवक यांच्यावरही गुन्हे दाखल होणार आहेत. त्यानंतर निलंबनाची टांगती तलवार आहे. यंदा पाऊस लवकर पडला असता तर या लुटीचा पुरावा हाती लागला नसता. ९ जून रोजी वाळू घाट बंद झाला. याच दरम्यान गोदावरीला पूर आला असता वाळू चोरीचा पुरावाच राहिला नसता.

### जिल्हाधिकाऱ्यांचे कौतुक करावे की...?

मुख्यमंत्र्यांच्या मर्जीतले विवेक जॉन्सन यांना गडचिरोलीहून बीडला आणले. शिस्तीचे अधिकारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. या प्रकरणातही जॉन्सन यांनी तातडीने गोदावरीचे सर्वेक्षण करून २५ हजार ब्रास वाळूचा भांडाफोड केला. अधिकाऱ्यांना पाठीशी न घालता थेट कारवाईचाही बडगा उगारला. त्याबाबत त्यांचे कौतुक करावेच लागेल मात्र प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे की, काही महिन्यांपासून एक तहसीलदार धूळफेक करून महसूल, पोलीस आणि आरटीओ या खात्याची दिशाभूल करत असताना २५ हजार ब्रास वाळू चोरी करत असताना जिल्हाधिकाऱ्यांना भनकही लागू नये हे धक्कादायक आहे. आता याच प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांचीही चौकशी होतेय की काय हे ही बघावे लागेल.

### एसआयटी नेमावी

गोदावरीच्या राक्षसभुवन वाळू घाटावरून बनावट पावत्या, बनावट ओटीपीचा वापर करत घरकुलाच्या नावाखाली वाळू उचलून बिनबोबाट ती खुल्या बाजारात विक्री करण्याची नामी शक्कल तहसीलदार खोमणे यांनी शोधली. काही महिन्यांपासून रोज शेकडो ब्रास वाळू उपसा होत असताना महसूल विभाग, गेवराईच्या उपविभागीय अधिकारी, चकलांबा पोलीस ठाणे, गेवराई पोलीस स्टेशन, महामार्ग पोलीस यांना याबाबत काहीच माहिती कशी नाही, असा प्रश्न आता पडू लागला आहे. महामार्गावर रोज शेकडो वाळूने भरलेले टिप्पर, हायवा, ज्यांना नंबरप्लेट नाही हे धावत असतात. त्यांना थांबवण्याचे, चौकशी करण्याचे काम का झाले नाही? असा प्रश्न उपस्थित करून वाळू चोरीत या सर्वांचेच संगनमत नाही ना? असा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे.

### तहसीलदारांसह दोषी अधिकाऱ्यांवर टाकला जाऊ शकतो ९० कोटींचा बोजा

सगळ्या सरकारी यंत्रणेला झोपेत ठेवून तहसीलदार आणि त्यांच्या बगलबच्च्यांनी १८ कोटी रुपयांची वाळू फस्त केली हे आता चौकशीत निष्पन्न झाले आहे. त्यांच्यावर गुन्हे दाखल करून निलंबनाची टांगती तलवारही आहे. मात्र एवढ्यावर भागणार नाही. अनधिकृत उत्खनन अधिनियमनानुसार उत्खनन केल्याप्रकरणी १८ कोटी रुपयांच्या वाळूसह पाच पट दंड असे एकूण ९० कोटी रुपयांचा बोजा दोषींच्या प्रॉपर्टीवर टाकला जाऊ शकतो. त्यासाठी प्रशासनाची भूमिका काय राहील हे ही आगामी काळात दिसून येईल

# माहेश्वरी बहू मंडल कडून एक बहीण - एक औषधी वनस्पती उपक्रम

**बीड दि. १४ (प्रतिनिधी ) :** राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत बीडमध्ये महेश नवमीचे औचित्य साधत माहेश्वरी बहू मंडल कडून एक बहीण - एक औषधी वनस्पती उपक्रम सुरु करण्यात आला. या हरित यज्ञाच्या माध्यमातून बीड शहरासह संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला पर्यावरण संतुलनाचा एक मोलाचा संदेश देण्याचा प्रयत्न माहेश्वरी बहु मंडळाने केला आहे.

या कार्यक्रमात उपस्थित मान्यवर महिला भगिनींना आवळा, तुळशी, कडुनिंब, कढीपत्ता, हडजोड, ओवा, गवती चहा, गुळवेल, पुदिना यांसारख्या ११ वेगवेगळ्या प्रकारच्या बहुगुणी औषधी वनस्पतींचे रोप सस्नेह भेट देण्यात आले. डॉ. सीमा चरखा यांनी उपस्थित सर्व भगिनींना या घरगुती औषधी वनस्पतींचे आरोग्यदायी फायदे, उपयोग आणि त्यांची काळजी कशी घ्यावी, याचे मार्गदर्शन केले. हा संपूर्ण सोहळा माहेश्वरी बहुमंडळाच्या अध्यक्षा कविता. कलंत्री, उपाध्यक्षासुवर्णा कासट, सचिव सोनल बाहेती, कोषाध्यक्षा आरती चरखा तसेच अमृता कलंत्री, शोभा लाहोटी, जयश्री लाहोटी आणि समस्त पदाधिकारी भगिनींच्या अथक परिश्रमातून यशस्वी झाला.

# एसटी बीड विभागातील नियमबाह्य बदल्या व बढत्यांची चौकशी करून विभाग नियंत्रकांवर कारवाई करा- बबन वडमारे

**बीड :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बीड विभागात दि. 1 जानेवारी 2024 पासून झालेल्या बदल्या, बढत्या, पदनियुक्त्या आणि प्रतिनियुक्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित जबाबदार अधिकार्यांवर कारवाई करावी तसेच विभाग नियंत्रक यांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी इंटकचे प्रादेशिक सचिव बबनराव वडमारे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, मुंबई तसेच मध्यवर्ती कार्यालयातील सुरक्षा व दक्षता अधिकार्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, बीड विभागात विविध पदांवरील बढत्या आणि बदल्या करताना सेवा ज्येष्ठतेचे निकष डावलण्यात आले असून नियम व परिपत्रकांना बगल देत काही कर्मचार्यांना लाभ मिळवून देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. वाहक ते लिपीक-टंकलेखक तसेच वाहक ते वाहतूक नियंत्रक या पदांवरील पदोन्नती प्रक्रियेत वरिष्ठतेचा विचार न करता निर्णय घेण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच चालक, वाहक, सहाय्यक वाहतूक नियंत्रक, एटीआय, टीआय, पर्यवेक्षक आणि इतर पदांवरील नेमणुका व प्रतिनियुक्त्यांमध्येही नियमबाह्य पद्धतीचा अवलंब करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असून अनेक निर्णय हे नियमांच्या चौकटीबाहेर जाऊन घेण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. तक्रारीत वाहतूक निरीक्षकांच्या बदल्यांचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे.

# आ.रोहित पवार यांच्या अन्नत्याग आंदोलनात महादेव गंगणे पाटील यांनी नोंदवला सहभाग



**परळी | प्रतिनिधी :** शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला परळी शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांनी भेट देत सक्रिय सहभाग नोंदविला. यावेळी त्यांनी आंदोलनाला जाहीर पाठिंबा देत शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांना आपला पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले. आंदोलनादरम्यान शेतकरी कर्जमाफीची मर्यादा वाढविणे, ओटीएस योजनेतील अटी शिथिल करणे, वंचित शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देणे, पीकविमा योजनेतील जाचक अटी रद्द करणे तसेच पेरणीपूर्वी शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासंदर्भातील मागण्या उपस्थित करण्यात आल्या. शेतकरी अडचणीत असताना शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन त्यांना दिलासा द्यावा, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

यावेळी विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत शासनाने तत्काळ निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# पुरुषोत्तमपुरी होडी दुर्घटनेतील महिलांच्या मृत्यूप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

माजलगाव -- तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथील गोदावरी नदीत भाविकांची वाहतूक करणारी होडी पलटून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलिसांनी कारवाई केली आहे. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवून निष्काळजीपणे होडी चालवल्याचा ठपका ठेवत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



अधिक मासानिमित्त पुरुषोत्तमपुरी येथे यात्रा सुरू असून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत आहेत. भाविकांना नदीपात्रातून दर्शनासाठी ने-आण करण्यासाठी होडी वाहतूक सुरू होती. मात्र संबंधित होडीत निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसवले जात असल्याचा प्रकार समोर आला आहे.

### १० जून रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली दुर्घटना

१० जून रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास गोदावरी नदीपात्रात भाविकांनी भरलेली होडी अचानक पलटली. होडीत क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी असल्याने अनेक भाविक पाण्यात पडले. या दुर्घटनेत दोन महिला भाविकांचा बुडून मृत्यू झाला, तर काही भाविक जखमी झाले.

मृतांमध्ये प्रमिला शेषराव राठोड (वय ५५, रा. बीबी, ता. लोणार, जि. बुलढाणा) आणि कांता ज्ञानदेव आंधळे (वय ५३, रा. कुंभेफळ, ता. सिंदखेड, जि. बुलढाणा) यांचा समावेश आहे.

### सुरक्षा सूचनांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप

प्रशासनाने यापूर्वी दिलेल्या नोटिसा आणि सुरक्षाविषयक सूचनांचे उल्लंघन करून धोकादायक पद्धतीने प्रवासी वाहतूक केल्याप्रकरणी कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणी ग्रामपंचायत अधिकारी पुरुषोत्तमपुरी नामदेव राजाराम कोकाटे यांच्या फिर्यादीवरून उद्धव बळीराम गायकवाड आणि दुर्गा उद्धव गायकवाड (रा. चागतपुरी, ता. परतूर, जि. जालना) यांच्याविरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास माजलगाव ग्रामीण पोलीस करीत आहेत.

# कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलामध्ये प्रवेशोत्सव तसेच पाठ्यपुस्तक वाटप संपन्न

**अंबड -(प्रतिनिधी) :** कै. दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलामध्ये शिशु वाटिका ते दहावीच्या विद्यार्थ्यांचे प्रवेशोत्सव व पुस्तक वाटप कार्यक्रम मोठ्या थाटामाटात संपन्न.. याप्रसंगी व्यासपीठावरती कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्री.व्यंकटेशजी गोसावी (अध्यक्ष -शालेय व्यवस्थापन समिती) तसेच प्रमुख उपस्थित माननीय सौ. ज्योतीभाभी ठाकूर ( उपाध्यक्ष - भा. प्र. शि. संस्था अंबाजोगाई), मा.श्री रमेशजी बुंदेलखंडे सन्माननीय सदस्य , मा. श्री.सुधाकर घायतडक (मुख्याध्यापक मा.वि ) श्री. प्रदीप जोशी सर (मुख्याध्यापक प्रा.वि) हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांचे औक्षण करून तसेच विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल घेण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. व त्यांना खाऊ देण्यात आले. तसेच त्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री. प्रदीप जोशी सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे तसेच पहिलीतील नवागतांचे स्वागत केले.व सर्व विद्यार्थ्यांना शाळा प्रारंभ तसेच प्रवेशउत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर ज्योतिभाभी ठाकूर या विद्यार्थ्यांना शुभेच्छा पर बोलताना म्हणाले की, लहान विद्यार्थी घडवणारे खरे शिक्षक हेच भाग्यवान असतात त्यांच्या हातून राष्ट्रनिर्मितीचं खरं कार्य होत असते. बालके हे निरागस असतात ते कोरी पाटी प्रमाणे असतात त्यांना आकार व उकार देण्याचं काम हे शिक्षक करत असतो.विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण शिक्षण देणे हे आज काळाची गरज आहे आणि हे कार्य चोखपणे शिक्षक करत असतो. विद्यार्थ्यांना शुभेच्छा पर बोलताना व्यंकटेशजी गोसावी म्हणाले की विद्यार्थ्यांना नाविन्याचा स्वीकार करावा व विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा करतो व सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतो.

# सावरकर माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

बीड (प्रतिनिधी) - शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या वर्षाची सुरुवात आज झाली. स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्रांगणात स्वागतासाठी फुग्यांची कमान लावून ढोल ताशाने व औक्षण करून पुष्पवृष्टी करत मुलांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक तथा मुख्याध्यापक मा. प्रा. चंद्रकांत मुळे, विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा उमेश जगताप, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष मा डॉ. पुरुषोत्तम कुलकर्णी शालेय समिती अध्यक्ष मा प्रमोदराव कुलकर्णी पर्यवेक्षक श्री हरिभाऊ साबळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना व्यासपीठावर बोलावून पुस्तके वितरीत करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांचा उत्साह गगनात मावेनासा झाला होता.

यावेळी नियोजन पुस्तिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. पुरुषोत्तम कुलकर्णी यांनी अध्यक्षीय समारोप करुन नव्याने प्रवेशित व इतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या.

मुख्याध्यापक श्री चंद्रकांत मुळे यांनी आजचा हा पहिला दिवस केवळ नव्या वर्गात जाण्याचा नसून, नवीन ज्ञान, कौशल्ये आणि उत्तम संस्कार आत्मसात करण्याचा एक नवा प्रवास आहे. मला खात्री आहे की, आपण सर्वांच्या साथीने हे वर्ष अत्यंत समृद्ध आणि यशस्वी करू." असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. नीता केंद्रे यांनी केले तर सूत्रसंचालन सौ. गौरी डावखरे यांनी केले. आभार प्रदर्शन सुनील पूलकुर्ते यांनी केले.

# धारूरच्या राजकारणात उडाला भडका! आमदार प्रकाश सोळंकेंवर 'भिकार चोट' शब्द वापरणारे महादेव तात्या डोक्यावर पडलेत का?; राष्ट्रवादीचा जळजळीत सवाल

## ..तर गाढवापुढे वाचली गीता! नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव आणि तालुकाध्यक्ष अमोल जगतापांचा महादेव तात्यांना सज्जड दम; तातडीने मानसिक उपचाराची गरज असल्याचे वक्तव्य

**किल्ले धारूर, १६ जून (प्रतिनिधी):** धारूर शहरात सध्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांचा धुरळा उडाला असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते आणि कार्यकर्ते विरोधकांवर अत्यंत आक्रमक झाले आहेत. १४ जून रोजी महादेव तात्या निर्मळ यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार माननीय प्रकाश दादा सोळंके यांच्यावर अत्यंत निंदनीय आणि 'भिकार चोट' अशा खालच्या पातळीवरील अपशब्दांचा वापर केला होता. या आक्षेपार्ह वक्तव्याचा सडेतोड समाचार घेण्यासाठी धारूरचे नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव आणि राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष अमोल जगताप यांनी स्वतंत्र पत्रकार परिषदा घेऊन विरोधकांना त्यांची जागा दाखवून दिली आहे.

### १५ वर्षांचा इतिहास विसरून दोन दिवसांत बदलले तात्या! — अमोल जगताप

तात्काळ आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे धारूर तालुकाध्यक्ष अमोलजी जगताप यांनी महादेव तात्या निर्मळ यांच्यावर तीव्र शब्दांत तोफ डागली. जगताप संतप्तपणे म्हणाले की, "तात्या तुम्ही डोक्यावर पडले आहात का? तुम्हाला तातडीने चांगल्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून मानसिक उपचाराची गरज आहे."

महादेव तात्यांच्या भूतकाळातील राजकीय वाटचालीची आठवण करून देत जगताप पुढे म्हणाले, "मागील सलग १५ वर्षांपासून तात्या निर्मळ हे आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या नेतृत्वाखाली एकनिष्ठेने काम करत होते. आजपर्यंत तात्यांच्या तोंडचा थोका कोरडा पडेपर्यंत ते स्वतः प्रकाश दादा हे कसे 'विकास पुरुष' आहेत, याचे गोडवे गाताना थकत नव्हते. असे असताना, अवघ्या दोन दिवसांत अचानक प्रकाश दादा वाईट कसे झाले? हा धारूरच्या जनतेला पडलेला मोठा प्रश्न आहे. केवळ स्वतःच्या



राजकीय स्वार्थापोटी ज्येष्ठ लोकप्रतिनिधीवर चिखलफेक करणे लाजीरवाणे आहे."

### सामाजिक आणि राजकीय ताकदीत तात्याच खरे भिकार चोट"

अमोल जगताप यांनी तात्यांना थेट आव्हान देत म्हटले की, सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय वजन, आर्थिक सुबत्ता किंवा औद्योगिक साम्राज्य; या सर्व आघाड्यांवर प्रकाश दादांच्या हिमालयासारख्या व्यक्तिमत्त्वाच्या समोर महादेव तात्या निर्मळ हे अगदीच नगण्य आहेत. या तुलनेत तात्याच या ठिकाणी खरे 'भिकार चोट' सिद्ध होतात. सार्वजनिक जीवनात वावरताना भाषेची मर्यादा कशी राखायची, याचे भान तात्यांनी पूर्णपणे सोडले असून ते आई-वडिलांनी दिलेले संस्कार विसरले आहेत.

### 'गाढवापुढे वाचली गीता', विरोधकांना विकासातलं काही कळत नाही! — नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव

दुसरीकडे, धारूर नगरीचे नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव यांनीही पत्रकार परिषद घेऊन आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहत विरोधकांचा चांगलाच पाणउतारा केला. जाधव म्हणाले की, "धारूरच्या राजकारणात अजितदादा पवार यांच्या माध्यमातून धारूरचा विकास करून त्याची 'बारामती' केली जाईल, असा शब्द आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी घेतला होता. राजकीय परिस्थिती काहीही असली, तरी अजितदादा धारूर शहराला मोठा निधी मिळवून देण्यासाठी आणि दिलेला शब्द पूर्ण करण्यासाठी पूर्णपणे प्रयत्नशील आहेत. विकासात्मक दृष्टिकोन ठेवूनच आमचे राजकारण सुरू आहे."

विरोधकांचा समाचार घेताना त्यांनी 'गाढवापुढे वाचली गीता' या म्हणीचा वापर केला. "विरोधकांना विकासातलं काहीही कळत नाही. ही त्यांची बालबुद्धी असून त्यांनी राजकारणाची पातळी सोडू नये. अशा खालच्या पातळीवर जाऊन बोलण्यासाठी घरातून चांगले संस्कार असावे लागतात, पण यांनी सर्व संस्कार सोडून दिले आहेत," असा थेट टोला जाधव यांनी लगावला. आमदारांसारख्या ज्येष्ठ लोकप्रतिनिधीबद्दल बोलताना भान ठेवायला हवे, असे सांगत त्यांनी विरोधकांनी शब्द जपून वापरण्याचा सल्ला दिला.

**अजित दादा गटाचा सज्जड दम आणि इशारा:**

पत्रकार परिषदेच्या शेवटी तालुकाध्यक्ष अमोल जगताप आणि नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव यांनी महादेव तात्या निर्मळ आणि त्यांच्या समर्थकांना अत्यंत कडक शब्दांत इशारा दिला आहे. "यापुढे जर तात्यांनी किंवा त्यांच्या समर्थकांनी माननीय प्रकाश दादा सोळंके साहेबांच्या विरोधात किंवा पक्षाच्या नेत्यांच्या विरोधात अशी असभ्य आणि पातळी सोडून भाषा वापरली, तर अजित दादा गटाचे कार्यकर्ते शांत बसणार नाहीत. पुढे कधीही बोलताना तात्यांनी आधी स्वतःची राजकीय व समाजकारण क्षेत्रातील औकात तपासावी, नीट विचार करावा आणि त्यानंतरच तोंड उघडावे," असा सज्जड दम राष्ट्रवादीच्या नेत्यांनी दिला आहे.

या दोन्ही पत्रकार परिषदांमुळे धारूरच्या राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली असून आगामी काळात दोन्ही गटांतील संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माजी सैनिक कुटुंबीयांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी १९ जून रोजी बैठक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ जून : जिल्ह्यातील सर्व नौदल माजी सैनिक, त्यांच्या विधवा पत्नी आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबीयांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी मुंबई येथील नौदल अधिकारी लातूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत १९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीला मुंबईहून येणारे नौदल अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहणार असून, ते माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या समस्या, तसेच प्रलंबित प्रश्न जाणून घेणार आहेत.

तरी आपल्या अडीअडचणी व समस्या मांडण्यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व नौदल माजी सैनिक, त्यांच्या विधवा पत्नी आणि अवलंबितांनी १९ जून रोजी सकाळी १० वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे यांनी केले आहे.



# विविध वृत्त...

## विधान परिषद निवडणुकीनिमित्त लातूर जिल्ह्यात चार दिवस मद्यविक्री बंद

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ जून : उस्मानाबाद-लातूर-बीड विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर लातूर जिल्ह्यात चार दिवस मद्यविक्री बंद राहील. निवडणूक खुल्या, मुक्त आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी मद्य विक्री बंदीचे आदेश जारी केले आहेत.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ मधील कलम १३५ (सी) आणि महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम १४२ (१) अन्वये देण्यात आलेल्या या आदेशानुसार, मंगळवार, १६ जून २०२६ रोजी दुपारी ४ वाजेपासून पुढे मद्य विक्री बंद राहील. तसेच मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजे बुधवार, १७ जून २०२६ रोजी संपूर्ण दिवस, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी म्हणजेच गुरुवार, १८ जून २०२६ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत आणि मतमोजणीच्या दिवशी, सोमवार, २२ जून २०२६ रोजी मतमोजणीच्या ठिकाणी प्रक्रिया पूर्ण संपेपर्यंत मद्य विक्री पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

हा आदेश लातूर जिल्ह्यातील प्रत्यक्ष मतदान व मतमोजणी होत असलेल्या सर्व संबंधित क्षेत्रांना लागू राहणार आहे. यामध्ये लातूर महानगरपालिका हद्दीसह रेणापूर, अहमदपूर, जळकोट, चाकूर, उदगीर, शिरूर अनंतपाळ, देवणी, औसा आणि निलंगा या सर्व नगर पंचायत हद्दींचा समावेश आहे. या सर्व नमूद क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या सर्व देशी आणि विदेशी मद्याची घाऊक व किरकोळ विक्री, तसेच ताडी विक्री अनुज्ञप्ती (नमुना एफएल-१, एफएल-२, एफएल-३, एफएल-४ क्लब अनुज्ञप्ती, सीएल-२, सीएल-३, टिओडी-३, टिडी-१ इत्यादी सर्व प्रकारची दुकाने) या आदेशित कालावधीत पूर्णपणे बंद राहतील.

सर्व संबंधित मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांनी या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. या आदेशाचे पालन करण्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ५४ व ५६ मधील तरतुदीनुसार संबंधितांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## लातूर जिल्ह्यात ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

तभा वृत्तसेवा

लातूर, १६ जून : महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. लातूर जिल्ह्यातील रेणापूर आणि जळकोट तालुक्यांमध्ये प्रत्येकी मुलांचे एक व मुलींचे एक अशी एकूण चार शासकीय वसतिगृहे कार्यरत असून या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवर्गनिहाय अर्ज करावे लागणार आहेत.

या प्रवेश प्रक्रियेत ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी ९० टक्के, ऊसतोड कामगारांचे पाल्य असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५ टक्के, ऊसतोड कामगार असलेल्या विधवा, परित्यक्ता व एकल पालक यांच्या पाल्यांकरिता ३ टक्के, तर ज्यांचे मृत्यू झालेले पालक ऊसतोड कामगार होते अशा अनाथ पाल्यांसाठी २ टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांनी ३० जून २०२६ पर्यंत अर्ज करणे आवश्यक असून त्यांची प्रवेश प्रक्रिया ७ जुलै २०२६ रोजी अंतिम केली जाईल, तर इयत्ता ११ वी, १२ वी आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी १५ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करावयाचे असून त्यांची प्रवेश प्रक्रिया ३१ जुलै २०२६ रोजी अंतिम करण्यात येणार आहे.

या वसतिगृहांमध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत शैक्षणिक साहित्य, स्टेशनरी, एका वेळेचा सकस नाश्ता आणि दोन वेळचे चविष्ट भोजन यासह विविध शैक्षणिक सोयी-सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे जिल्ह्यातील अधिकाधिक ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी त्वरित अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा. प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी संबंधित वसतिगृहांचे गृहपाल तसेच सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

# नांदेडचे मतदार पर्यटनाला तर लातूरचे मतदार केवळ ' लक्ष्मीदर्शन' वरच खूश ..?

तरूण भारत स्पेशल

श्रीधर स्वामी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ जून : स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघासाठी येत्या १८ तारखेला मतदान होणार आहे. या निवडणुकीत नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर, बीड, उस्मानाबाद विधान परिषद मतदार संघात महायुतीच्या उमेदवारांचे पारडे सुरुवातीपासूनच जड आहे. विशेष म्हणजे दोन्ही मतदार संघ भाजपाकडे आहेत. नगर पंचायत - नगर परिषद - महानगरपालिका तसेच पंचायत समिती - जिल्हा परिषदेचे सदस्य या निवडणुकीचे मतदार असून मतदार इकडे तिकडे जाऊ नये म्हणून त्यांना उमेदवारांकडून पर्यटनासह लक्ष्मीदर्शनाचा लाभही दिला जात आहे. शेजारच्या नांदेड मतदार संघातील मतदार लक्ष्मीदर्शनासह गोव्याला पर्यटनाला गेले आहेत. लातूरच्या मतदारांची बोळवण मात्र केवळ ' लक्ष्मीदर्शन'वर केली गेल्याची चर्चा राजकीय वर्तुळात चांगलीच रंगत आहे.

समाजमाध्यमांवर व्हायरल झालेले गोवा टूरचे छायाचित्र...



या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघात भाजप - महायुतीचे निर्विवाद वर्चस्व आहे. भाजपने लातूरमधून पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे माजी राज्यमंत्री बसवराज पाटील मुरूमकर यांना तर नांदेडमधून पूर्वाश्रमीचे काँग्रेसचेच माजी आमदार अमरनाथ राजूरकर यांना निवडणुकीच्या आखाड्यात उतरवले आहे. राजूरकरांसाठी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी आपली ताकद लावली होती. राजूरकर सुरुवातीपासूनच चव्हाणांचे खंदे समर्थक राहिले आहेत. जिकडे चव्हाण - तिकडे राजूरकर असे म्हटल्यास ते फारसे वावगे ठरणार नाही. मुरुमकरही म रब्बी राजकारणी ते दिवंगत माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे मानसपुत्र म्हणूनही अवघ्या महाराष्ट्राला परिचित आहेत.

चाकूरकरांच्याअनेक लोकसभा निवडणुकांमध्ये उमरगा पट्ट्याची कमान मुरुमकरांच्या खांद्यावरचअसायची, हेही सर्वज्ञात आहे. बदलत्या राजकीय समिकरणात मुरुमकरांनी काँग्रेसचात्याग करून भाजपशी जवळीक साधली. भाजपनेही त्यांच्या ज्येष्ठत्वाचा मान राखत त्यांच्यावर लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आणि विधानपरिषदेची उमेदवारीही बहाल केली आहे. या निवडणुकीसाठी भाजपकडून डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांचेही नाव चर्चेत होते. पण, पक्षाने मुरुमकरांना प्राधान्य दिले.या निवडणुकीत मतदार फुटू नये म्हणून उमेदवारांकडून त्यांची खास बडदास्त ठेवली जाताना दिसत आहे. अन्य मतदारसंघाप्रमाण `या दोन मतदार संघातमहायुतीला फारसे टेन्शन नाही. तरीही शेजारच्या नांदेड मतदार संघातील मतदार उमेदवारांच्या खर्चाने गोवा पर्यटनाला गेले असून तेथील बीचवरील नाचगाण्याचे व्हिडीओ समाजमाध्यमांवर चांगलेच व्हायरल झालेले पाहायला मिळत आहे. आपआपल्या प्रभागातील नागरिकांच्या अडचणी - समस्यांकडे ही नगरसेवक मंडळी मस्त पर्यटनाचा आनंद घेताना दिसत आहेत. त्यामुळे अशी मौजमजा करणाऱ्या नगरसेवकांवर समस्यांनी त्रस्त मतदार खाजगीत भरभरून तोंडसुख घेताना पाहायला मिळत आहेत.

नांदेडच्या मतदारांप्रमाणेपर्यटनाचे हे सुख लातूरच्या मतदारांच्या नशिबी नसल्याचेएकंदर परिस्थितीवरून दिसून येत आहे. त्यातच लातूर - बीड - उस्मानाबाद मतदार संघातील काँग्रेसच्या उमेदवारांची जबाबदारी काँग्रेसने माजी मंत्री अमित देशमुख यांच्याकडे सोपविली आहे. देशमुखांनीही ही जबाबदारी स्वीकारल्याचे पत्रकार परिषदेत सांगत या मतदार संघात यावेळी चमत्कार होणार असल्याचे सूतोवाच केले होते. परंतु सद्याची धामधूम पाहता ज्या पद्धतीने अमित देशमुख यांची काम करण्याची शैली आहे, त्याची मतदार संघात दृश्य परिणाम दिसून येत नसल्यामुळे महाविकास आघाडीमधील घटक पक्षाचे मतदान काँग्रेसच्या उमेदवाराला पडेल की नाही ? याची साशंकता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, शेजारील नांदेड मतदार संघातील मतदारांची गोवा टूर सोशल मिडीयावर पाहणारे लातुरातील महाविकास आघाडीतील घटक पक्षाचे मतदार आपली संधी हुकल्याची खंत खाजगीमध्ये व्यक्त करताना दिसत आहेत.

## आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्याचे प्रवेश उत्सव साजरा

तभा वृत्तसेवा

देवणी दि. १६ जून : दि. १५ वार सोमवार रोजी आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज देवणी येथे नवीन विद्यार्थ्यांचे भव्य स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे संस्था अध्यक्ष गोंविदराव भोपणीकर यांच्या हस्ते शाळेच्या प्रवेशद्वारावरील फीत कापून व मुलांना पुष्पगुच्छ, फुले व मिठाई वाटप करून त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी संस्था सचिव गजानन भोपणीकर , कै . रसिका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे , बोरोळ गावचे सरपंच कृष्णा पाटील, बिरादार शेषराव ,प्रताप कोयले , पवन शिवाजी हुरुषनाळे , सत्यवान बालूरे ,देवणी चे माजी सरपंच देविदास पतंगे ,पालक प्रतिनिधी हनुमंत गवळी ,वेदप्रकाश जानापुरकर , दयानंद दळवी , विजयकुमार भोजने इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.



याच कार्यक्रमात डॉ सत्यवान सोनटक्के यांना आबासाहेब इंग्लिश स्कूल देवणीचे प्राचार्य म्हणून संस्था अध्यक्ष व संस्था सचिव व प्रमुख पाहुणे यांच्या उपस्थितीत नियुक्ती देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सत्यवान सोनटक्के यांनी केले .तर प्रमुख पाहुणे देवीदास पतंगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ श्रद्धा घोलपे यांनी केले. या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी पालक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## २४ जून रोजी आझाद मैदानावर भव्य मोर्चा




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ जून : अनुसूचित जातीतील उपेक्षित व वंचित घटकांना न्याय मिळावा तसेच सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निकालानुसार अनुसूचित जातीमध्ये उपवर्गीकरण लागू करण्यात यावे आणि सामाजिक न्याय व सलोखा कायम राखावा, या प्रमुख मागण्यांसाठी अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या वतीने पुणे ते मुंबई असा लॉन्ग मार्च आयोजित करण्यात आला आहे. ही माहिती संघटनेच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

पुणे येथील आद्य क्रांतिगुरू देशपिता लहुजी बाबा साळवे यांच्या समाधीस्थळापासून १७ जून रोजी या लॉन्ग मार्चला प्रारंभ होणार असून २४ जून रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे भव्य मोर्चा व आंदोलनाने त्याची सांगता होणार आहे.

या आंदोलनाला होल्हार, बुरूड, मेहतर, भंगी, हिंदू खाटीक, कैकाडी, चांभार, ढोर, मोची आदी उपेक्षित जातींसह विविध सामाजिक संघटना व संघटनांचा पाठिंबा मिळत असल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

या आंदोलनाचे नेतृत्व लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या सुनबाई सावित्रीमाई साठे, नातू सचिनभाऊ साठे, गणेशभाऊ भगत, अण्णाभाऊ साठे यांचे नाती व नातजावई, ड. टी. एन. कांबळे आणि राज क्षीरसागर हे करणार आहेत. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधून संघटनेचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली.

## महिला सक्षमीकरणासाठी विलासराव देशमुख फाउंडेशनचा पुढाकार प्रभाग क्र. ३ मध्ये मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ जून : विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ३ मधील संत गोरोबा सोसायटी विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर येथे महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र क्र. १५ ची सुरुवात करण्यात आली आहे.



राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ग्री लि.च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारातून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात येत आहेत. विलासराव देशमुख फाउंडेशनच्या प्रयत्नातून शहरी भागातील महिलांना रोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. फाउंडेशन महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम करत आहे. या नवीन प्रशिक्षण केंद्रामध्ये एकूण ८३ महिलांनी सहभाग नोंदवला आहे. या प्रशिक्षणात महिलांना शिलाईच्या शिवणकामातील विविध पद्धती शिकवल्या जाणार आहेत.

संस्थेच्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे यांच्या शुभहस्ते या केंद्राचे उद्घाटन झाले. यावेळी प्रभागचे नगरसेवक विकास कांबळे सोशल मीडिया प्रमुख प्रवीण सूर्यवंशी, ट्रेनर प्रेमा ठाकूर, संस्थेचे समन्वयक गजानन बोयणे सोशल प्लॅनर सोमनाथ कावळे आणि प्रभागातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## भारतीय किसान संघाचा शेतकरी मेळावा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ जून : भारतीय किसान संघ यांच्या वतीने २६ ते २९ जून २०२६ या चार दिवसात लातूर जिल्ह्यातील विविध ठिकाणी शेतकरी मेळावा व पद्मश्री सन्मान प्राप्त डॉ. श्रीरंग देवबा लाड यांचा सत्कार असा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला असून या मेळाव्याला जिल्ह्यातील शेतकर्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले व मंत्री सतीश देशपांडे-तावशीकर यांनी केले आहे.

भारतीय किसान संघाने जिल्ह्यात २६ जून २०२६ रोजी लातूर येथील एमआयटी कॉलेज येथे सकाळी १० वाजता प्रगतशील शेतकरी तुळशीरामअण्णा कराड व काशीरामनाना कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा संपन्न होणार आहे. या मेळाव्यास जिल्हाभरातील शेतकर्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## एसटी महामंडळाच्या लातूर विभागात 'प्रवासी राजा दिन' 'कामगार पालक दिन' उपक्रमाचे वेळापत्रक जाहीर

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ जून : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या समस्या, तक्रारी आणि सूचनांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण व्हावे, या उद्देशाने एसटी महामंडळाने प्रत्येक आगारात 'प्रवासी राजा दिन' आणि 'कामगार पालक दिन' आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, या अनुषंगाने लातूर विभागातील आगारांसाठी या उपक्रमाचे सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या वेळापत्रकानुसार लातूर विभागातील या उपक्रमाची सुरुवात १७ जून २०२६ रोजी औसा आगारातून होणार असून, त्यानंतर २४ जून रोजी उदगीर, १ जुलै रोजी निलंगा, ८ जुलै रोजी अहमदपूर आणि २२ जुलै २०२६ रोजी लातूर आगार येथे या विशेष मोहिमेचे आयोजन केले जाणार आहे.

या जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक संबंधित आगारात एकाच दिवशी दोन सत्रांत हा उपक्रम राबविला जाणार असून, पहिल्या सत्रात सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत 'प्रवासी राजा दिन' आयोजित केला जाईल, ज्यामध्ये सर्वसामान्य प्रवासी, विविध प्रवासी संघटना, तसेच शाळा व महाविद्यालयांचे प्रतिनिधी सहभागी होऊन आपल्या बस सेवेसंबंधीच्या अडीअडचणी, तक्रारी आणि सुधारणांसाठीच्या सूचना लेखी स्वरूपात संबंधित अधिकाऱ्यांसमोर मांडू शकतील.

प्रवाशांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर, त्याच दिवशी दुसऱ्या सत्रात दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत 'कामगार पालक दिन' राबविण्यात येणार असून,

यामध्ये एसटी कर्मचारी आणि कामगार संघटनांचे प्रश्न ऐकून घेत कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक प्रश्न, रजा मंजुरी, कर्तव्याचे वेळापत्रक आणि प्रशासकीय कारवाई यांसारख्या तक्रारी व अडीअडचणींचे तात्काळ निराकरण केले जाणार आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी १८ जून रोजी मतदान ; ४५२ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ जुन -**

महाराष्ट्र विधान परिषद नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी तीन उमेदवार निवडणूक रिंगणात असून मतदानासाठी नांदेड जिल्ह्यातील महसूल उपविभागांच्या ठिकाणी एकूण आठ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

मतदान गुरूवार १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ यावेळेत होणार आहे. मतदानासाठी येताना मतदारांनी स्थानिक प्राधिकरणाकडून देण्यात आलेले ओळखपत्र अथवा भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या पुराव्यांपैकी एक पुरावा सोबत आणणे आवश्यक आहे.

सदर निवडणुकीमध्ये एकूण ४५२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून त्यापैकी २२४ स्त्री मतदार तर २२८ पुरुष मतदार आहेत. या मतदारांमध्ये जिल्ह्यातील महानगरपालिकेचे सर्व सदस्य तसेच नांदेड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद व नगरपंचायतांचे अध्यक्ष आणि सदस्य यांचा समावेश आहे.

मतदान केंद्राचे ठिकाण व मतदान केंद्रात जोडण्यात आलेल्या स्थानिक प्राधिकरणाचे नाव आणि मतदारांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

तहसील कार्यालय किनवट येथील मतदान केंद्रात किनवट नगरपरिषद-२४, नगरपंचायत माहूर-१७ असे एकूण ४१ मतदार मतदानाचा हक्क बजावतील याप्रमाणे तहसील कार्यालय हदगाव या मतदान केंद्रावर नगरपरिषद हदगाव-२३, नगरपंचायत हिमायतनगर-१९ एकूण ४२, तहसील कार्यालय भोकर येथील मतदान केंद्रात नगरपरिषद भोकर-२५, नगरपरिषद मुदखेड-२३ एकूण ४८ मतदार, तहसील कार्यालय नांदेड येथील मतदान केंद्रात अर्धापूर नगरपंचायत-१९, नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड-८९ असे एकूण १०८ मतदार मतदानाचा हक्क बजावतील.

तहसील कार्यालय कंधार येथील मतदान केंद्रात नगरपरिषद कंधार-२३, नगरपरिषद लोहा-२३ असे एकूण ४६ मतदार तर तहसील कार्यालय धर्माबाद येथील मतदान केंद्रात नगरपरिषद धर्माबाद-२५, नगरपरिषद उमरी-२३ एकूण ४८ तर तहसील कार्यालय बिलोली येथील मतदान केंद्रात नगरपंचायत नायगाव-१९, नगरपरिषद बिलोली २३, नगरपरिषद कुंडलवाडी-२३ असे एकूण ६५ तर तहसील कार्यालय देगलूर येथील मतदान केंद्रात नगरपरिषद देगलूर-३१, नगरपरिषद मुखेड-२३ असे एकूण ५४ मतदार आहेत. याप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील एकुण ४५२ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावतील.

त्यानंतर सोमवार दिनांक २२ जुन रोजी सकाळी ०८.०० वाजता या निवडणुकीची मतमोजणी कॅबिनेट हॉल नियोजन भवन तळमजला जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे होणार आहे.

# शेतकरी कर्जमाफीच्या जीआरची शिवसेनेकडून होळी




**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ जुन -**

राज्य सरकारने सातबारा कोरा करण्याच्या नावाखाली शेतकऱ्यांची क्रूर थट्टा केली असून कर्जमाफीसाठीच्या अटी अत्यंत जाचक आहेत. त्यामुळे ही कर्जमाफी नसून कर्ज वसुली आहे असा गंभीर आरोप करत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने आज शासनाच्या जीआरची होळी करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या अशी मागणी करण्यात आली आहे.

जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या आंदोलनात जिल्हाप्रमुख भुजंग पाटील डक, जिल्हा संघटक नरहरी वाघ महानगर प्रमुख मनोज यादव, तालुकाप्रमुख सुनिल पाटील कदम, प्रवक्ते डॉ. बालाजी पेनुरकर, तालुकाप्रमुख पद्माकर पाटील सावंत, तालुकाप्रमुख नंदू पाटील वैद्य, विधानसभाप्रमुख विजय कल्याणकर, शहरप्रमुख जितुसिंग टाक, तालुका संघटक नवनाथ पाटील जोगदंड, उप तालुकाप्रमुख पुरभाजी जाधव पासदगावकर, युवासेना डॉ. सौरभ देवकत्ते, मारोतराव कदम, विठ्ठलराव कदम, ब्रिजलाल उगवे, गजानन देशमुख, प्रवीण देशमुख, व्यंकटी बाराटे, माधव पांचाळ, बाबासाहेब जोगदंड, बालाजी कल्याणकर, सुरेश पावडे, किशोर ठाकूर,भाया शर्मा, लालचंद यादव व असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

राज्य सरकारने नुकतीच अनेक अटी व शर्ती घालून कर्जमाफीची घोषणा केली आहे. मात्र सदर अटी-शर्तीचा अभ्यास केला असता ही योजना प्रत्यक्षात कर्जमाफी योजना नसून कर्जवसुली योजना असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. या योजनेमध्ये प्रामुख्याने सन २०१९ ते २०२५ या कालावधीचा उल्लेख करण्यात आलेला आहे. यापूर्वी सन २००८ मधील केंद्र शासनाची कर्जमाफी, तसेच सन २०१७ व २०१९ मधील राज्य शासनाच्या कर्जमाफी योजनांमधूनही राज्यातील अनेक पात्र शेतकरी वंचित राहिले आहेत. काही शेतकऱ्यांना तीन-तीन वेळा कर्जमाफीचा लाभ मिळाला, तर अनेक शेतकऱ्यांना एकदाही कर्जमाफीचा लाभ मिळू शकलेला नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. सध्यास्थितीत जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफीमध्ये नियमित कर्जफेड करणारे शेतकरी असोत किंवा थकीत शेतकरी असोत, त्यांच्यावर विविध अटी व शर्ती लादण्यात आल्या आहेत. या अटी-शर्ती म्हणजे भीक नको पण कुत्रे आवर अशा स्वरूपाच्या आहेत. विधानसभा निवडणुकीच्या काळात आपण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना प्रत्येक सभेमध्ये सातबारा कोरा करू असे आश्वासन दिले होते. मात्र आजच्या घडीला हे आश्वासन पूर्णपणे विसरल्याचे चित्र दिसून येत आहे.त्यामुळे कोणत्याही अटी-शर्तीशिवाय राज्यातील सर्व शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करून सातबारा कोरा करण्यात यावा यासह अन्य मागण्या तातडीने मान्य न झाल्यास शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही शिवसेनेने दिला आहे.

# आ.कोहळीकरांच्या पाठपुराव्यास यश चार मंडळातील शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होण्यास सुरुवात

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १६ जुन -**

हदगाव - हिमायतनगरातील खरीप हंगाम २०२५ यावर्षीचा सोयाबीन पीक विमा मंजूर झाला होता पण त्यात ११ मंडळातील ४ मंडळ जवळगाव, तळणी, निवघा व तामसा या शेतकरी बांधवांना पिक विमा ची रक्कम खात्यामध्ये जमा झाली नव्हती ही गंभीर बाब समोर आली असता आ. कोहळीकर यांनी लगेच कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांच्याकडे दि.१५ मे २०२६ रोजी भेट घेत सदरील विषय निवेदनाद्वारे त्यांच्याकडे चार मंडळातील वंचित राहणाऱ्या शेतकरी बांधवांबद्दल त्वरित पिक विमा वाटप करण्याची मागणी केली होती त्यांच्या या पाठपुराव्यास यश मिळाले असून चारही मंडळातील शेतकरी बांधवांच्या खात्यात पीक विमा रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे शेतकरी बांधवांमधून समाधान व्यक्त होत आहे.



खरीप हंगाम २०२५ चा हदगाव तालुक्यासाठी ११४ कोटी रुपये तर हिमायतनगर तालुक्यासाठी ४०.५० कोटी रुपये पिक विमा मंजूर झाला होता पण त्यात गंभीर बाब म्हणजे या दोन्ही तालुक्यातील ४ मंडळ ( जवळगाव, तळणी, निवघा व तामसा ) वगळून बाकीच्या सात मंडळातील शेतकरी बांधवांच्या खात्यात रक्कम जमा झाली होती. चार मंडळातील शेतकरी बांधव पिक विमा पासून वंचित राहत असल्यामुळे त्यांची नाराजी प्रचंड वाढली असताना या गंभीर प्रकरणाकडे आ. कोहळीकर यांनी लागलीच दखल घेत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे याकडे लक्ष वेधून घेत तात्काळ विमा कंपनी व प्रशासनास आवश्यक निर्देश देण्याची मागणी केली होती त्याचीच दखल घेत या चार मंडळातील शेतकरी बांधवांच्या खात्यात ही पिक विमा रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली असून आ. कोहळीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, राज्य कृषी मंत्री आशिष जयस्वाल ,जिल्हाधिकारी नांदेड, जिल्हा कृषी अधिकारी व सर्व प्रशासकीय यंत्रणाचे सहकार्य केल्याबद्दल आभार व्यक्त केले.

# अर्धापूर तालुक्यातील 'लहान' गावाचा सुपूत्र सर्वेश लोणे आयआयटीमध्ये

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ जुन -**

अर्धापूर तालुक्यातील 'लहान' या छोट्याशा गावाने पुन्हा एकदा आपल्या कर्तृत्वाने जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. गावातील दिवंगत ज्येष्ठ लेखक, कवी आणि नाट्यकर्मी प्रा. दु. मो. लोणे यांचा नातू, सर्वेश महेंद्र लोणे याने 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' (IIT) २०२६ च्या प्रवेश परीक्षेत उत्तुंग यश मिळवत देशातील सर्वोच्च संस्थेत प्रवेश निश्चित केला आहे.



लहानपणापासूनच अभ्यासाची आवड आणि जिद्द उराशी बाळगून सर्वेशने आपले स्वप्न सत्यात उतरवले आहे. त्याचे शालेय शिक्षण सातारा जिल्ह्यातील फलटण येथे झाले, तर पुढील शिक्षण त्याने नागपूर येथील दीक्षाभूमी परिसरात पूर्ण केले. अत्यंत चिकाटीने अभ्यास करत, त्याने मागासवर्गीय प्रवर्गातून (SC Categor) ऑल इंडिया रँक ८५२ मिळवून हे यश संपादन केले आहे.

सर्वेशचे वडील नागपूर येथील मदर डेअरीमध्ये कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत, तर आई गृहिणी आहे.

अत्यंत सामान्य परिस्थितीतून येऊनही सर्वेशने दाखवलेली ही ध्येयवेडी वाटचाल इतर विद्यार्थ्यांसाठी एक आदर्श ठरली आहे. कठोर परिश्रम आणि जिद्द असेल, तर कोणत्याही कठीण ध्येयापर्यंत पोहोचता येते, हा संदेश त्याने आपल्या यशातून दिला आहे.

सर्वेशच्या या नेत्रदीपक यशाबद्दल संपूर्ण परिसरातून आनंदाचे वातावरण आहे. त्याचे शिक्षक, मित्रपरिवार, नातेवाईक आणि ग्रामस्थांनी त्याचे अभिनंदन करत, त्याच्या पुढील वाटचालीस व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. 'लहान' गावातील या सुपुत्राने एका मानाचा तुरा खोवल्यामुळे गावासह संपूर्ण नांदेड जिल्ह्याची मान अभिमानाने उंचावली आहे.

### ज्ञानाच्या वाटेवर बैलगाडीतून चिमुकल्यांची आनंदयात्रा

**नायगांव** -नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारा आणि शिक्षणाविषयी आत्मीयता निर्माण करणारा प्रवेशोत्सव सोहळा नरसी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत सोमवारी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. नव्याने प्रवेश घेतलेल्या चिमुकल्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आल्याने संपूर्ण गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.



केंद्रप्रमुख कपिलेश्वर नलबलवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या प्रवेशोत्सवात प्रवेशपात्र विद्यार्थ्यांना आकर्षक पद्धतीने सजविलेल्या बैलगाडीत बसवून नरसी(जुनेगांव)परिसरा तून भव्य मिरवणूक काढण्यातआली.या वेळी पारंपरिक संस्कृतीची झलक आणि शिक्षणाचा संदेश देणारी ही आनंदयात्रा ग्रामस्थांच्या विशेष आकर्षणाचा विषय ठरला आहे. गावकऱ्यांनी नवागत विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त स्वागत करत शुभेच्छांचा वर्षाव केला.

यावेळी गटविकास अधिकारी प्रवीण वानखेडे व गटशिक्षणाधिकारी सतिश दर्शनवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. तसेच त्यांच्या पावलांचे ठसे घेऊन शैक्षणिक जीवनाच्या मंगल प्रारंभाचे स्वागत करण्यात आले. शाळेत दाखल झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण करून नवीन शैक्षणिक वर्षाची आनंददायी सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान गटविकास अधिकारी वानखेडे आणि गटशिक्षणाधिकारी सतिश दर्शनवाड यांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थी, शिक्षक व पालकांशी संवाद साधला.

त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत शिक्षणाच्या माध्यमातून उज्वल भविष्य घडविण्याचा संदेश दिला. विद्यार्थ्यांच्या मनात शाळेविषयी प्रेम, आपुलकी आणि शिक्षणाबद्दलची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या याउपक्रमाचे पालक व ग्रामस्थांनी मनापासून कौतुक केले. नवागत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्या वरील निरागस आनंद व उत्साह पाहून उपस्थितांनाही समाधानाचा अनुभव आला. शिक्षणाची वाट अधिक आनंददायी आणि प्रेरणादायी बनविणारा हा प्रवेशोत्सव नरसी गावांसाठी संस्मरणीय ठरला.

### राष्ट्रीय खेळाडू मिलींद लोणे यांच्याकडून टेबल टेनिसच्या खेळाडूंना प्रशिक्षण

**नांदेड** -टेबल टेनिसचे सुवर्णपदक विजेते राष्ट्रीय खेळाडू तथा राज्य संघाचे माजी कर्णधार मिलींद लोणे यांनी टेबल टेनिस खेळाविषयी विद्यार्थी व युवकांत आवड निर्माण व्हावी या उद्देशाने मोफत प्रशिक्षण केंद्र सुरु केले आहे. लेबर कॉलनी, नांदेड येथील प्रशिक्षण केंद्रात टेबल टेनिस खेळणाऱ्या गरीब व होतकरु खेळाडूंना तंत्रशुद्ध पद्धतीचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याशिवाय एकवेळेस अल्पोपहार देण्यात येणार आहे. नवोदित किंवा जुन्या खेळाडूंनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन लोणेज् टेबल टेनिस ट्रेनिंग सेंटरच्या वतीने करण्यात आले आहे.



# आंबेडकरवादी साहित्य संमेलनात रंगली काव्यपौर्णिमा



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ जुन -**

येथील सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने दरमहा येणाऱ्या पौर्णिमेचे औचित्य साधून काव्यपौर्णिमा हा कविसंमेलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. आता मी काव्यपौर्णिमा शतकापार गेली असून गेल्या नऊ वर्षांपासून सुरू असलेली या महिन्यातील १०७वी काव्यपौर्णिमा नुकत्याच पार पडलेल्या २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनात ख्यातकीर्त विद्रोही कवी नितीन चंदनशिवे यांच्या उपस्थितीत संपन्न झाली यावेळी कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध कवयित्री ज्योती परांजपे ह्या होत्या तर विद्रोही कवी विवेक मवाडे, कॉ. डॉ आदिनाथ इंगोले, यवतमाळ येथील सुप्रसिद्ध कवयित्री अर्चना खोब्रागडे, साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा काव्यपौर्णिमेचे संकल्पक प्रज्ञाधर ढवळे, साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, नागोराव डोंगरे, मारोती कदम, कैलास धुतराज, मुख्य संयोजक गणेश शिंगे, संयोजन समितीचे अध्यक्ष उन्मेश ढवळे, निमंत्रक जी. पी. मिसाळे आदींची उपस्थिति होती.

सत्यशोधक विचार मंच आणि मनपा कामगार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात विद्रोही कवी नितीन चंदनशिवे यांच्या उपस्थितीत सप्तरंगी साहित्य मंडळाची १०७ वी काव्यपौर्णिमा रंगली यात संभाजी खंडागळे, प्रा. सुनीलचंद्र सोनकांबळे, रुपाली वागरे वैद्य, प्रतिभा पांडे, भाग्यश्री आसोरे, अलका मुगटकर, ज्योती पतिंगराव, सुजाता पोपुलवार, सावित्री शेवाळकर, उषाताई ठाकूर, बालिका बरगळ, मा. ह. देशमुख उंचेगांवकर, आ. ग. ढवळे, डी. एन. मोरे खैरकेकर, जीवन मांजरमकर, प्रकाश ढवळे नागलगांवकर, राहुल वाडे, शिवाजी गोडबोले, शंकर माने, अशोक कुबडे, गजानन हिंगमिरे, साईनाथ रहाटकर, थोरात बंधू, दत्ताहरी कदम, धर्मश्री लोणे आदी कवी कवयित्रींनी सहभाग नोंदविला.

लोकशाही मूल्ये, विषमता, संघर्ष, सामाजिक वास्तव आणि परिवर्तनाच्या भावनांना शब्दरुप दिले. १०७ वी काव्यपौर्णिमा ऐतिहासिक आणि संस्मरणीय ठरली. सहभागी कवी कवयित्रींना सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने काव्यवाचन केल्याबाबतचे प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. काव्यपौर्णिमेचे प्रास्ताविक प्रज्ञाधर ढवळे यांनी केले. सूत्रसंचालन मुळावा येथील कवी सज्जन बरडे यांनी केले तर आभार राज गोडबोले यांनी मानले. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी कोंडदेव हाटकर, श्रावण नरवाडे, प्रभू ढवळे, लालबाजी घाटे, विजय गोणारकर, राहुल गवारे, शनिदास वाघमारे, एन. टी. पंडित, रमेश कांबळे, संजय जाधव, एम. डी. जोंधळे, आर. पी. झगडे, रमेश कसबे, शोभा कोकरे, गंगाधर धडेकर, रंजिता गजभारे, अर्चना गवारे, पी. के. खानापूरकर, सुमेधा हाटकर आदींनी परीश्रम घेतले. कविसंमेलनाला विचारवंत, स्त्री पुरुष काव्यरसिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती

# अर्धापूर जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहात



**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. १६ जुन -**

पीएम श्री जि.प. हायस्कूल, अर्धापूर येथे २०२६-२७ या नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात अतिशय उत्साही वातावरणात झाली. शाळेच्या पहिल्याच दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत अर्धापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ. वैशाली प्रवीण देशमुख यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे औचित्य साधून नगराध्यक्षा सौ. वैशाली प्रवीण देशमुख आणि उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षण हेच प्रगतीचे मुख्य साधन आहे. नियमित अभ्यास, शिस्त आणि जिद्द यांच्या जोरावर तुम्ही भविष्यात नक्कीच यशस्वी व्हाल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी या सोहळ्यास मुख्याधिकारी जगदीश दळवी, शाळेचे मुख्याध्यापक डॉ. एम. डब्लू. शेख, महावितरणचे अभियंता पंकज देशमुख, राठोड, लक्ष्मीकांत मुळे पत्रकार संघाचे उपाध्यक्ष शेख साबेर, आझर काजी, आणि शिक्षिका श्रीमती भालेराव यांची विशेष उपस्थिती होती. नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी मिळालेल्या या प्रोत्साहनामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी केले. व उपस्थितांचे आभार मानले.

# विकसित भारत बिल्डथॉनमध्ये चौफाळा शाळेच्या नावीन्यपूर्ण प्रकल्पाची निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ जुन -**

विकसित भारत बिल्डथॉन २०२५ या देशपातळीवरील नवसंशोधन स्पर्धेत निवड झालेल्या जिल्हा परिषद हायस्कूल, चौफाळा येथील विद्यार्थ्यांनी आज जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांची भेट घेऊन आपल्या नावीन्यपूर्ण प्रकल्पाची माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तयार केलेली मेघना कावली यांची फायबर-रेझिन प्रतिकृती त्यांना भेट म्हणून प्रदान केली.



शालेय स्तरावरील नवसंशोधकांचा शोध घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विकसित भारत बिल्डथॉन २०२५ या स्पर्धेत चौफाळा शाळेच्या स्मार्ट ब्रिज सेफ्टी अलार्म सिस्टीम या नावीन्यपूर्ण प्रकल्पाची देशपातळीवर निवड झाली आहे. नांदेड जिल्ह्यातून सादर झालेल्या हजारो प्रस्तावांमधून निवड झालेल्या ९३२ कल्पना आणि प्रारूप नमुन्यांमध्ये या प्रकल्पाचा एकमेव समावेश आहे. या यशस्वी प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांच्या गटाला प्रत्येकी १० हजार रुपयांचे पारितोषिक प्राप्त झाले असून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे.

या स्पर्धेत अनेक नामांकित खाजगी शाळांनी सहभाग नोंदविला होता. यातून नांदेडच्या चौफाळा येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण प्रकल्पाने आपली वेगळी छाप पाडत राष्ट्रीय स्तरावरील निवड मिळवली. त्यामुळे खाजगी शाळांनाही मागे टाकत जिल्हा परिषद शाळेने आपल्या गुणवत्ता, संशोधनवृत्ती आणि नवकल्पनांच्या जोरावर अव्वल स्थान सिद्ध केले आहे.

विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या या प्रकल्पामध्ये पुलावरून वाहने खाली कोसळून होणारे अपघात टाळण्यासाठी तांत्रिक उपाय सुचविण्यात आला आहे. शाळेच्या ४ड क्रिएटर्स या बालवैज्ञानिक गटाने हा प्रकल्प विकसित केला आहे. या गटात इयत्ता नववीतील शुभम संतोष मानेकर, साईराज राजेश लांडगे, शादुल्ला खय्युम शहा व श्रीजय संजय कुळदेवकर यांचा समावेश असून त्यांना विज्ञान शिक्षक उमाकांत डिंगणे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांमध्येही मोठी संशोधन क्षमता असल्याचे सांगितले. योग्य मार्गदर्शन, जिज्ञासा आणि परिश्रम यांच्या बळावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा शेती, जलसंधारण, जलव्यवस्थापन आणि दैनंदिन जीवनातील विविध क्षेत्रांमध्ये प्रभावी वापर कसा करता येईल, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार, मुख्याध्यापक बालासाहेब कच्छवे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक बालाजी नागमवाड, विज्ञान शिक्षक रवी पांचाळ, आयटीसी लॅब प्रमुख उमाकांत परळीकर, धनंजय गुम्मलवार आदी उपस्थित होते. या यशामुळे चौफाळा शाळेच्या विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला आणि नावीन्यपूर्ण संशोधन क्षमतेला नवी ओळख मिळाली असून जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतकरी कर्जमुक्तीसाठी आधार व ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करा

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे शेतकऱ्यांना आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ जून**

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'चा लाभ घेण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपला आधार क्रमांक चालू मोबाईल क्रमांकाशी संलग्न करून ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि जिल्हा उपनिबंधक सहकारी सुरेखा फुफाटे यांनी केले आहे.

नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ आणि अतिवृष्टीमुळे पीक कर्जाची वेळेत परतफेड करू न शकलेल्या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन राज्य शासनाने ही कर्जमुक्ती योजना लागू केली आहे. या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या आणि ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचा विचार करण्यात येणार आहे.

योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. यापूर्वीच्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्ती दिली जाणार आहे. तसेच सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची नियमित परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आहे, त्यांनी 'एकरकमी समझोता' योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यास ते कर्जमुक्तीसाठी पात्र ठरणार आहेत. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. या योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून लाभ मिळविण्यासाठी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांकडे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच राष्ट्रीयकृत बँकांचे थकीत पीक कर्ज असल्यास, शासनाच्या निकषांमध्ये बसणाऱ्या शेतकऱ्यांना कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तर नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ मिळणार असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक सहकारी सुरेखा फुफाटे यांनी दिली.

माहिती अपूर्ण असल्यामुळे कोणताही शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी बँक खाते, मोबाईल क्रमांक आणि जमीन नोंदी अद्ययावत करून घ्याव्यात. तसेच मयत खातेदारांच्या वारसांची नोंद पूर्ण करून ॲग्रीस्टॅक नोंदणीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ संदर्भात समितीची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा उपनिबंधक सहकारी सुरेखा फुफाटे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक सुजीत झोडगे तसेच विविध व्यापारी बँकांचे जिल्हा समन्वयक उपस्थित होते.

या बैठकीत कर्जमाफी अर्ज स्वीकारण्याबाबतचे नियोजन निश्चित करणे, आधार कार्ड व ॲग्रीस्टॅक नोंदणीची प्रलंबित कामे तसेच मयताच्या वारसाच्या नोंदी पूर्ण करण्यासाठी विशेष मेळाव्यांचे आयोजन करणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी जनजागृती व नोंदणी शिबिरे घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या.

# वनामकृवि आणि बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्र यांच्यात करार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ जून**

मराठवाडा व राज्यातील हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि हळद प्रक्रियेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी एक ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र, वसमत (जि. हिंगोली) यांच्यात आज एका महत्त्वपूर्ण सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

हरिद्रा संशोधन केंद्राचे अध्यक्ष ना. हेमंत पाटील यांच्या विशेष संकल्पनेतून आणि मार्गदर्शनातून हा करार घडून आला आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. इंद्र मणी यांच्या प्रमुख उपस्थितीत संचालक संशोधन डॉ. खिजर बेग आणि हरिद्रा संशोधन केंद्राचे व्यवस्थापकीय संचालक प्रदीप कच्छवे यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. हा करार यशस्वी करण्यासाठी विद्यापीठाचे संचालक संशोधन डॉ. खिजर बेग यांनी विशेष प्रयत्न केले. या वेळी विद्यापीठाचे वतीने डॉ. भगवान आसेवार, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), संचालक विस्तार, डॉ. राकेश अहिरे, सहयोगी संचालक, डॉ. रणजीत चव्हाण, डॉ. सुनीता पवार, प्रभारी अधिकारी डॉ. खंदारे, डॉ. कुलदीप शर्मा तर हरिद्रा संशोधन केंद्रातील तंत्रज्ञ अधिकारी, रमेश देशमुख, संशोधन सहयोगी डॉ प्रसाद गंगाखेडकर, श्रीमती प्रिया गावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी बोलताना कुलगुरू प्रा. डॉ. इंद्र मणी म्हणाले की, मराठवाड्यातील हळद हे एक प्रमुख नगदी पीक आहे. या करारामुळे विद्यापीठाचे संशोधन थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत आणि प्रक्रिया उद्योगांपर्यंत पोहोचेल. उत्पादन खर्च कमी करून गुणवत्तापूर्ण हळद उत्पादनाद्वारे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न दुप्पट करण्यास मदत होईल. या सामंजस्य करारातून संशोधन केंद्राच्या कार्यात भर पडेल. विद्यापीठाच्या सहकार्याने संशोधनास अधिक चालना मिळेल. विद्यापीठाचाच एक भाग म्हणून केंद्राला सर्वतोपरी सहकार्य व मदत केली जाईल. भविष्यात या केंद्राची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी सर्वच क्षेत्रात जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातील. विद्यापीठाचा व संशोधन केंद्राचा कायमस्वरूपी संवाद राहण्यासाठी संशोधन केंद्राचा स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# कोळी महासंघाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ जून**

तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी कोळी बांधवांना अनुसूचीत जमातीचे जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र सुलभरित्या मिळावे यासाठी परिपत्रक काढण्याचे आश्वासन दिले होते परंतु त्यानंतर निवडणुकांच्या आचारसंहितामुळे प्रलंबीत राहीले असून तत्काळ यासंदर्भात शासनाने परिपत्रक काढावे या मागणीसाठी दि १६ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर कोळी महासंघाच्यावतीने मोर्चा काढण्यात आला.

आदिवासी कोळी बांधवांना दि २० आक्टोबर २०२३ रोजीच्या बैठकीत तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी आश्वासीत केले होते. राज्यातील अनुसूचीत जमातीतील बांधवांचे जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र सुलभरित्या मिळणे आणि रक्त नात्यातील समाज बांधवांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी तातडीने परिपत्रक काढण्याबाबत आश्वासन दिले होते परंतु त्यानंतर विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमुळे आदिवासी कोळी समाजाचे परिपत्रक काढण्यात दिरंगाई झाल्यामुळे समाजामध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सदरील आश्वासन पूर्ण करण्यासाठी तातडीने परिपत्रक काढण्यात यावे अशी मागणी यावेळी कोळी महासंघाच्यावतीने शासनाकडे करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.




**हिंगोली– येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात निवडणुक विभागाची एसआयआर संदर्भात बैठक पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी मार्गदर्शन केले. यावेळी निवडणुक विभागातील अधिकारी तसेच बीएलओ यांची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

# परभणी–हिंगोली विधान परिषदेत डॉ. नावंदर विरूध्द खान यांच्यात काट्याची लढत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ जून**

परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीतील संघर्ष चांगलाच तापला असून, निवडणुकीची खरी लढत महाविकास आघाडीचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे डॉ. विवेक नावंदर आणि महायुतीचे शिवसेना (शिंदे गट)चे सईद खान यांच्यातच रंगली असल्याचे चित्र दिसत आहे. अपक्ष उमेदवार सुशील देशमुख यांनी मागील निवडणुकीमध्ये शांत राहिल्याने त्यांचा मतदारावर असलेला विश्वास कमी झाला आहे आणि विश्वासार्हता आज देखील त्यांची मागील निवडणुकीच्या तुलनेत कमी झाल्याने मतदारांकडून डमी उमेदवार म्हणून पाहिले जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

संख्याबळाच्या दृष्टीने महायुती वरचढ मानली जात असली, तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये केवळ आकडे निर्णायक ठरत नाहीत, हे मागील निवडणुकीतील निकालांनी स्पष्ट केले आहे. तुलनेने कमी संख्याबळ असूनही ठाकरे गटाने विजय मिळविला होता. त्यामुळे यंदाही डॉ. विवेक नावंदर इतिहासाची पुनरावृत्ती करणार का, याकडे राजकीय जाणकारांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, परभणी महानगरपालिकेतील राजकीय समीकरणांचाही या निवडणुकीवर प्रभाव दिसून येत आहे. मागील महापालिका निवडणुकीत ठाकरे गटाचे २५ नगरसेवक निवडून आले होते. स्वतंत्र सत्ता स्थापनेची संधी असूनही काँग्रेसला सोबत घेत महाविकास आघाडीचा प्रयोग यशस्वी करण्यात आला होता. त्यावेळी सुशील देशमुख यांचे बंधू यांना उपमहापौरपद देऊन सत्तेत महत्त्वाचे स्थान देण्यात आले होते.

अशा परिस्थितीत विधान परिषदेची जागा ठाकरे गटाकडे गेल्यानंतरही काँग्रेसशी जवळीक असलेल्या सुशील देशमुख यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केल्याने महाविकास आघाडीत नाराजीची कुजबुज सुरू झाली आहे. आघाडीतील कार्यकर्ते आणि पदाधिकारी मात्र डॉ. नावंदर यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे बोलले जात आहे.

मतदारांमध्ये सध्या नावंदर की खान? अशीच चर्चा रंगली असून, राजकीय विश्लेषकांच्या मते निवडणुकीतील खरी चुरस डॉ. विवेक नावंदर आणि सईद खान यांच्यातच आहे.

'विकासकामांवर मतदारांचा विश्वास; विजय निश्चित' – डॉ. विवेक नावंदर

मागील अनेक वर्षांत परभणी आणि हिंगोली जिल्हात विविध विकासकामे आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये केवळ संख्याबळ नव्हे, तर विश्वास आणि कामगिरी महत्त्वाची ठरते. मागील वेळी कमी संख्याबळ असूनही आम्ही विजय मिळविला होता. यंदाही विजय निश्चित आहे, असा विश्वास डॉ. विवेक नावंदर यांनी व्यक्त केला.

# अन्न व औषध प्रशासनाच्या धास्तीने हिंगोलीतील पान टपऱ्या बंद, मुंडे पॅटर्नचा धसका

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ जून**



महाराष्ट्र राज्याच्या अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाची धुरा धडाकेबाज सनदी अधिकारी तुकाराम मुंडे यांनी हाती घेतल्यापासून राज्यातील बेकायदेशीर आणि मानवी आरोग्याला घातक ठरणारे पदार्थ विकणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. या 'मुंडे पॅटर्न'चा थेट परिणाम आता हिंगोली शहरातही पाहायला मिळत असून, शहरातील बहुतांश भागांमधील पान टपऱ्या चालकांनी स्वतःहून बंद ठेवल्याचे चित्र आहे.

गेल्या काही दिवसांपासून हिंगोली शहरातील बाजारपेठ, मुख्य रस्ते आणि गल्लीबोळातील पान टपऱ्या कुलूपबंद अवस्थेत दिसत आहेत. अन्न व औषध प्रशासनाकडून केव्हाही आणि कशीही धडक कारवाई होऊ शकते, या भीतीने लहान-मोठ्या विक्रेत्यांनी चांगलीच धास्ती घेतली आहे.

तुकाराम मुंडे यांनी पदभार स्वीकारताच अन्न सुरक्षेच्या नियमांचे कडक पालन करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले आहेत. प्रतिबंधित सुगंधी तंबाखू, गुटखा आणि आरोग्याला हानिकारक असणाऱ्या पदार्थांच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी आणण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. हिंगोलीतही अन्न व औषध प्रशासनाचे पथक केव्हा धाड टाकेल याचा नेम नसल्याने, कारवाईच्या आणि मोठ्या दंडाच्या भीतीने पान टपरी चालकांनी आपले व्यवसाय तात्पुरते बंद ठेवणेच पसंत केले आहे. साहेबांनी चार्ज घेतल्यापासून नियमांची कडक अंमलबजावणी सुरू झाली आहे. किरकोळ कारवाईपेक्षा थेट दुकाने सील केली जात असल्याच्या चर्चेमुळे आम्ही काही दिवस टपरी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

नेहमी गजबजलेल्या राहणाऱ्या पान टपऱ्या अचानक बंद झाल्यामुळे हिंगोलीकरांमध्येही वेगवेगळ्या चर्चा रंगत आहेत. केवळ पान टपऱ्याच नव्हे, तर खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्या इतर लहान–मोठ्या व्यावसायिकांनीही धास्ती घेतली असून, स्वच्छता आणि नियमांची पूर्तता करण्यासाठी लगबग सुरू केली आहे. आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या या कडक भूमिकेमुळे आरोग्याशी खेळणाऱ्या अवैध विक्रेत्यांचे धाबे दणाणले असून, प्रशासनाचा हा वचक किती दिवस राहतो, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# रेल्वे संघर्ष समितीची लोकप्रतिनिधीसोबत महत्वपूर्ण बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ जून**



हिंगोली जिल्हा आणि परिसरातील प्रवाशांच्या हक्काच्या रेल्वे सुविधा, नवीन रेल्वे मार्ग आणि प्रलंबित मागण्यांसाठी 'हिंगोली जिल्हा रेल्वे संघर्ष समिती'ची एक महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीला राज्यसभेचे नवनिर्वाचित खासदार रामराव वडकुते आणि भाजपचे आमदार तानाजीराव मुटकुळे प्रामुख्याने उपस्थित होते.

या बैठकीत जिल्ह्यातील रेल्वेच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर विस्तृत चर्चा करण्यात आली असून, रेल्वे प्रशासन व केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे याचा पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बैठकीत खासदार रामराव वडकुते यांनी हिंगोली जिल्ह्यातील रेल्वेच्या समस्या केवळ कागदावर न ठेवता त्यावर प्रत्यक्ष कृती करण्याचा आराखडा मांडला. त्यांनी रेल्वे संघर्ष समितीला आश्वासन देतांना सांगितले की, हिंगोली जिल्ह्यातील सर्व रेल्वे समस्यांचे तीन टप्प्यांत वर्गीकरण केले जाईल. वर्गीकरणानुसार प्रत्येक समस्येवर एक कालबद्ध कार्यक्रम तयार करून त्याचा पद्धतशीर पाठपुरावा करण्यात येईल, रेल्वे संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यां सोबत सातत्याने या प्रश्नांचा आणि समस्यांचा नियमित आढावा घेतला जाईल.

बैठकीत हिंगोली जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांच्या व व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी महत्त्वाच्या मागण्यांवर चर्चा झाली व त्यांचे प्रस्ताव तयार करण्यात आले. त्यामध्ये हिंगोली येथे रेल्वेची शेकडो एकर जमीन व मालधक्का उपलब्ध आहे. परंतु, सुसज्ज गोदामाची व्यवस्था नसल्याने व्यापाऱ्यांचे नुकसान होते. येथे तातडीने गोदाम उभारण्यात यावे.

वसमत रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर प्रवाशांना ऊन आणि पावसापासून संरक्षणासाठी तातडीने कव्हर शेड निर्माण करावे. या भागातील रेल्वे वाहतुकीचा वेग वाढवण्यासाठी अकोला रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. हिंगोलीकरांना मुंबई आणि नागपूरशी जोडण्यासाठी नांदेड-कुर्ला आणि छत्रपती संभाजीनगर-नागपूर या नवीन रेल्वे गाड्या त्वरित सुरू कराव्यात.

नवीन रेल्वे मार्ग: जिल्ह्यांतर्गत दळणवळणाची गती देण्यासाठी 'वारंगा फाटा - कळमनुरी-हिंगोली' या नवीन रेल्वे मार्गाची निर्मिती करण्यात यावी. भाविकांच्या सोयीसाठी गाडी क्रमांक ०६१८२/०६१८१, १७७१९/१७७२०, आणि १७६०५/१७६०६ या गाड्यांना शेगाव रेल्वे स्थानकावर प्रायोगिक तत्त्वावर थांबा देण्यात यावा. अमरावती-पुणे रेल्वेचा प्रवासाचा वेळ कमी करून वेळापत्रकात योग्य सुधारणा करावी, ज्यामुळे हिंगोली व वाशीम जिल्ह्यातील प्रवाशांची सोय होईल.

आषाढी एकादशीसाठी हिंगोली, वाशीम आणि परभणी भागातून जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांसाठी शेगाव ते पंढरपूर विशेष रेल्वे गाड्या सोडण्यात याव्यात. बैठकीत ठरल्यानुसार, या सर्व मागण्यांचे सविस्तर निवेदन घेऊन रेल्वे संघर्ष समितीचे एक शिष्टमंडळ लवकरच केंद्रीय रेल्वेमंत्री, तसेच मध्य व दक्षिण-मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांची प्रत्यक्ष भेट घेणार आहे. लोकप्रतिनिधी आणि समितीच्या पदाधिकाऱ्यांनी हे सर्व प्रलंबित प्रश्न वेळेत मार्गी लावण्याचा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. बैठकीला माजी आमदार गजाननराव घुगे, एड. के. के. शिंदे, नंदकिशोर तोष्णीवाल, वसंत भट्ट, गोवर्धन वीरकुंवर, शेख नईम भाई, खलील बेलदार, सुनील मानका, कैलास शहाणे, गोविंद प्रजापती, संजय कावडे आदी सहभागी झाले होते.

# विवाहीतेचा अश्लील व्हीडीओ काढून ब्लॅकमेल करीत अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ जून**

जिल्ह्यातील एका विवाहीत महिलेला धमकी देऊन अत्याचार केला. त्याचा अश्लील व्हीडीओ काढून बदनामीची धमकी देणाऱ्या एका तरूणासह दोघांवर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून पोलिसांनी तपास कामाला गती दिली असून दोन्ही आरोपींचा शोध सुरू करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली शहरातील बावनखोली भागातील अमनखान या तरूणाने जिल्ह्यातील एका महिलेस प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर तिच्या इच्छेविरूध्द अत्याचार केला यावेळी तिला धमकीही दिली. मात्र भिती पोटी तिने सदर प्रकार कोणालाही सांगितला नाही. त्यानंतर अमनखान याने वेळोवेळी तिला धमकी देऊन शारीरिक संबंध ठेवले.

सदर महिला तिच्या लहान बहिणीच्या लग्नासाठी हिंगोली शहरात आली असतांना अमनखान याने बळजबरीने तिच्या घरात प्रवेश करून तिचा विनयभंग केला. यावेळी त्याच्या सोबत असलेला त्याचा मित्र सलमानखान याने महिलेचे अश्लील व्हिडीओ काढून बदनामी करण्याची धमकी दिली. मागील तीन वर्षापासून त्यांचा अत्याचार सहन करणाऱ्या महिलेने अखेर त्यांच्या धमक्यांना भिक न घालता सोमवार दि १५ जून रोजी रात्री थेट हिंगोली शहर पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

यावरून हिंगोली शहर पोलिसांनी अमनखान व सलमानखान यांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून पोलिस उपअधीक्षक कुंदनकुमार वाघमारे, पोलिस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर, सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद बनसोडे, उपनिरीक्षक युवराज वाघमारे यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून तपासाची माहिती घेतली आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद बनसोडे पुढील तपास करीत आहेत.

या घटनेमुळे तीव्र पडसाद उमटत असून अशा घटनांना आळा घालण्यासाठी तसेच अशा आरोपींना कठोर शिक्षा होण्याची मागणी सर्वसामान्य नागरिकांमधून होत आहे.